निवेदक:
शंकर अभ्यंकर

# खजिन्याचे बेट

'ट्रेझर आयलंड' या जगप्रसिद्ध कादंबरीचा
संक्षिप्त अनुवाद

BVBK-0402891

मेहता पब्लिशिंग हाऊस

■ प्रथमावृत्ती नोव्हेंबर, १९९३

■ प्रकाशक
सुनील अनिल मेहता,
मेहता पब्लिशिंग हाऊस,
१२१६, सदाशिव पेठ,
पुणे.

■ मुद्रक
संगम प्रेस प्रा. लि.,
कोथरूड,
पुणे.

■ अक्षरजुळणी
इन्द्र कॉम्प्युटर्स,
'तृप्तिदीप', ४१, एल. आय. सी. कॉलनी,
योगाचार्य कोल्हटकर पथ,
४२/२, पर्वती
पुणे.

■ मुखपृष्ठ
बाबू उडुपी

■ किंमत पंचवीस रुपये

■ © सौ. अपर्णा अभ्यंकर

म. ग्रं. सं, ठाणें, बालमालय शाखा.
बाल वाङ्मय विभाग
अ. क्र. 2८९ दिनांक
विषय क्र.

गोष्टीवेल्हाळ
अभिजित, जितेन्द्र, अश्विनी,
आदित्य आणि अमित
यांना-

BVBK-0402891

# अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| १. | गूढ पाहुणा | ५ |
| २. | धुमश्चक्री | १५ |
| ३. | बंड | २३ |
| ४. | खजिन्याच्या बेटावर | ३० |
| ५. | मृत्यूशी लपंडाव | ३६ |
| ६. | बेन गनचं रहस्य | ४४ |

म. पं. मं. ठाणे, वाचनालय शाखा.
बाल वाङ्मय विभाग.
क्र. 2८९
विषय को-का-

## १. गूढ पाहुणा

जीवघेण्या प्रवासाची एकदा अखेर झाली. आम्ही सर्वजण लंडनला सुखरूप पोचलो. मृत्यूच्या ओठावरून चालूनही मृत्यूनं आम्हाला गिळलं नाही, याचा अपरंपार आनंद आम्हा सर्वांच्या मनात होता.

प्रचंड दौलतीचे, जहागिरीचे मालक-उमराव ट्रेलॉने भलतेच खुषीत होते. अर्थात डॉ. लिव्हसे यांचा आनंदही काही कमी नव्हता म्हणा ! एकमेकांशी वारंवार हस्तांदोलन करून दोघंही देवाचे आभार मानत होते.

त्यांचा मुलांसारखा उत्साह बघून मला मनात हसू फुटत होतं. पण त्याच वेळेला त्या जीवघेण्या प्रवासाची आठवण येऊन शहारायलाही होत होतं.

उमराव ट्रेलॉने यांनी माझी पाठ थोपटून म्हटलं,

'बेटा, नशीबवान आहेस. मृत्यूच्या लपंडावाचा अनुभव तुला फार लहानपणी आला.'

डॉ. लिव्हसे माझ्याकडं बराच वेळ रोखून पाहात बसले होते. अचानक पुढं झुकून त्यांनी एकदा खांदे उडवले आणि मनाशी काही विचार करून मला म्हटलं,

'जिम, तुला मी एक गोष्ट सुचवतो. पटते का पहा.'

'कोणती ?', मी मोठ्या औत्सुक्यानं विचारलं.

'आपण केलेला प्रवास अफाटच होता', डॉ. लिव्हसे म्हणाले, 'असं धाडस आणि असा जीवघेणा प्रवास क्वचितच कुणी केला असेल.'

'होय, पण तुमचं म्हणणं काय ?', उमराव ट्रेलॉने यांनी मधेच विचारलं.

क्षणभर डॉ. लिव्हसे काहीच बोलले नाहीत. कपाळावरच्या आठ्यातून त्यांनी आपलं बोट फिरवलं. मग शांतपणे ते म्हणाले,

'आपल्या थरारक प्रवासाचा वृत्तांत तू लिहून काढलास तर?' मी त्या कल्पनेनंच थरारलो. उमराव ट्रेलॉने यांनी ढगाच्या गडगडाटाएवढं हास्य केलं. डॉ. लिव्हसे यांना ते म्हणाले,

'बहोत अच्छे! अगदी माझ्या मनातली कल्पना बोललात. आपल्या बुड्ढयांना ते जमायचं नाही. पण जिम ते करूशकेल.'

डॉ. लिव्हसे यांनी उमरावांच्या बोलण्याला दाद दिली आणि माझ्या पाठीवर थाप मारली. प्रवासाच्या आठवणी लिहिण्याचं माझ्या मनात होतंच. इतक्यात डॉ. लिव्हसे म्हणाले,

'पण जिम, या आठवणींचा केवळ गोषवारा नको. जे घडलं, जसं घडलं ते सगळं तू बारीक-सारीक तपशिलासह लिहून काढ.'

या कल्पनेला मी मान्यता दिली. खजिन्याच्या बेटावर केलेला थरारक प्रवास मी लिहून काढला आणि तोच मी तुम्हाला आता सांगणार आहे. आमचा प्रवास अजब होता. आम्ही एक वेगळीच दुनिया पाहिली होती. आम्ही पाहिलं होतं-खजिन्याचं बेट!---

--- १७४३ सालातली ही गोष्ट आहे. माझ्या वडिलांची खानावळ होती. समुद्रकिनाऱ्यावरच्या खेड्यातली खानावळ- जशी असायची तशीच होती. खानावळीतच दारूचा गुत्ता होता आणि प्रवाशांची राहाण्याचीही सोय होती. त्यामुळं आमच्याकडं माणसांचा राबता बरा असे.

वडिलांनी खानावळीचं नाव ठेवलं होतं - 'दि ॲडमिरल बेनबो.' पण आमच्या खानावळीचा थाट म्हणजे 'नाव सोनूबाई, हाती कथलाचा वाळा' अशापैकीच होता. खानावळीची सगळी व्यवस्था माझे वडीलच बघत असत. आई त्यांना थोडीफार मदत करत असे. मी लहानच होतो. पुढं वडील अचानक आजारी झाले आणि त्यांची तब्येत एकदा ढासळली ती कायमचीच.

आई मला वडिलांच्या तब्येतीबद्दल कधीच सांगत नसे. डॉ. लिव्हसेही मी कधी विचारलं, तर हसण्यावारी नेत. वडिलांना काय झालं होतं कुणास ठाऊक, पण मुळातच त्यांना समुद्राकाठची हवा मानवत नसावी, असा माझा अंदाज होता.

वडील आजारी पडल्यावर माझ्या छोट्या खांद्यावर मोठी जबाबदारी आली.

पाण्यात पडल्यावर पोहता येतं म्हणतात, तसं माझं झालं. खानावळ कशी चालवायची, यातल्या बऱ्याच गोष्टी मला कळायला लागल्या.

बिचारी आई ! कितीही दमलेली असली तरी मला नेहमीच मदत करायची. वडिलांचं दुखणं निस्तरायचं आणि वर पुन्हा मला मदत करायची. मला आठवतं, ते हिवाळ्याचे दिवस होते. आमच्या आयुष्यात आता वादळ येणार होतं. अंगात उबदार कपडे घालून मी उगाचच टिवल्या-बावल्या करत होतो. खानावळीपुढच्या अंगणात उड्या मारत होतो. अंगात ऊब येण्यासाठी !

तितक्यात अंधारातून सैतान यावा, त्याप्रमाणं धुक्यातून एक उंचापुरा माणूस पुढं आला. रांगडा आणि रापलेला गडी होता तो. बहुधा तो खलाशी असावा. कारण खलाशी घालतात, तसला निळा डगला त्याच्या अंगात होता. तोंडावर शस्त्राचे घाव बसले असावेत. त्यामुळं अगोदरच कुरूप असलेला त्याचा चेहरा आणखीच भेसूर दिसत होता. डोक्यामागचे केस त्यानं नको इतके वाढवले होते आणि त्यांची वेणी बांधली होती.

त्याचे हात बघून मला घामच फुटला. एखाद्या फावड्यासारखे टणक आणि रुंद असे तळहात होते त्याचे.

खानावळीसमोर आल्यावर तांबरलेल्या डोळ्यानं त्यानं आजुबाजूचा परिसर न्याहाळून पाहिला. आजुबाजूचा शांत परिसर त्याला आवडला असावा.

वडिलांकडं वळून तो म्हणाला,

'छान जागा आहे. मला आवडली. काय दोस्ता, इथं बरेच वाटसरू राहात असावेत.'

त्या माणसाचा आवाज त्याच्या रुपाला साजेसा होता. एखाद्या गंजलेल्या पत्र्यावर सुरी फिरवावा, तसा त्याचा आवाज येत होता. खरखरीत आणि चरचरीत !

त्याचा प्रश्न ऐकून माझे वडील केविलवाणं हसले. मग चाचरत म्हणाले,

'नाही साहेब, माझ्या खानावळीत तशी फारशी गर्दी कधीच नसते.'

आलेलं गिऱ्हाईक जातं की काय, अशा भीतीनं आणि काळजीनं वडिलांच्या स्वरात आणखीनच अजिजी आली होती.

'खरं की काय ?' हास्याचा गडगडाट करत पाहुणा म्हणाला, 'मग फारच छान ! अशीच जागा मला हवी होती.'

क्षणभर त्यानं विसावा घेतला आणि बंदरापासून आलेल्या हमालाच्या नावानं तो ओरडला,

'हॉय ! चल पळ. आळशी डुक्कर आहेस तू. उचल, उचल ती पेटी अगोदर !'

मी पेटीकडं पाहिलं. खलाशी प्रवासात वापरतात, तसली एक प्रचंड लाकडी पेटी हॉयनं उचलली आणि जिन्यानं तो वरच्या खोलीकडं निघाला.

'जपून ने. गडबड केलीस तर तंगडी मोडेन !', पाहुणा पुन्हा गरजला.

'छान ! छान ! ही जागा मस्तच आहे', माझ्या वडिलांकडं वळून बोलतांना त्याच्या आवाजाची पट्टी थोडी खाली आली, 'हे बघ, मी इथं राहाणार असलो, तरी मला तुझी फारशी आवश्यकता भासणार नाही. मी तसा स्वभावानं अगदी गरीब मनुष्य आहे. माझी तुला अजिबात कटकट होणार नाही. समजलं ?'

वडिलांनी नुसती मान डोलावली.

'मला खायलाही फारसं लागत नाही. खारवलेलं डुकराचं मांस मला आवडतं. थोडी अंडी आणि त्याच्या जोडीला रम असली की आपलं भागतं.'

खारवलेल्या डुकराच्या मांसाचं नाव त्यानं काढल्यावर माझ्या तोंडाला पाणी सुटलं.

'तुमचं --- तुमचं नाव काय ?', वडिलांनी धीर करून विचारलं.

पुन्हा एकदा त्या पाहुण्यानं हास्याचा गडगडाट केला आणि म्हटलं,

'माझ्या नावाशी तुला काय करायचं आहे ? माझं नाव काही का असेना - असू दे. समजलं ? मला फक्त कॅप्टन म्हणायचं !'

असं म्हणून त्यानं जाकिटाच्या खिशातून सोन्याची चार नाणी बाहेर काढली आणि वडिलांच्या पुढ्यात टाकली.

पिवळ्याधमक चकाकीची नाणी वडिलांनी पटकन् उचलली आणि खिशात घालतांना कॅप्टनकडं बघून होकारार्थी मान हलवली.

कॅप्टनचा धिप्पाड देहही डुलत डुलत त्याच्या खोलीकडं निघून गेला.

हमाली खिशात घातून हॉय बाहेर आल्यावर मी त्याला विचारलं,

'ही वल्ली कुठली रे ?'

'कुणास ठाऊक ! मला तरी त्यानं कुठं काय सांगितलंय्. काल तर मेल कोचनं कॅप्टन आला. किंग जॉर्ज हॉटेलात उतरला होता. पण तिथं माणसांची वर्दळ फार होती. शेवटी बहाद्दर गेला वैतागून. दूर आणि एकांतात असलेल्या खानावळीची

त्यानं माझ्याजवळ चौकशी केली. मी तुमच्या खानावळीचं नाव सुचवलं आणि-'

'अच्छा ! म्हणून वल्ली इथं आली होय !', मी स्वतःशीच पुटपुटलो.

पुढच्या काही दिवसात कॅप्टनचा स्वभाव कसा आहे, हे आम्हा सर्वांच्या लक्षात आलं. कॅप्टनला काय हवं आणि काय नको ते मलाही उमजलं. कारण बराच वेळ मी त्याच्याच तैनातीत असे.

कॅप्टन बहुतेक त्याच्या खोलीतच थांबायचा. कुणाला भेटावं किंवा कुणाशी मैत्री करावी, असं त्याला कधीच वाटत नसे. माणसांचा त्याला तिटकारा होता. माझ्याशिवाय कुणी त्याच्या खोलीकडं गेलं तरी त्याचं डोकं फिरत असे. आपण कुणाच्या दृष्टीला पडू नये, अशी खास खबरदारी त्यानं घेतलेली होती.

नाही म्हणायला, खानावळीत वर्दळ कमी असली की रम पिण्यासाठी कॅप्टन यायचा. रम पिऊन रंगला की भसाड्या आवाजात गाणीही म्हणत असे. पण त्याची जागा बहुधा खानावळीच्या अंधाऱ्या कोपऱ्यात असे.

एखादा अनोळखी मनुष्य खानावळीत आला की कॅप्टन त्याचा देह अंधाऱ्या कोपऱ्यात चोरून घ्यायचा. त्याच्या चेहऱ्यावर भीती उमटायची. मला नवल वाटायचं. असं का व्हावं ?

मी वयानं लहान असलो तरी काही गोष्टी माझ्या लक्षात यायला लागल्या. कॅप्टनच्या मनावर कसलं तरी दडपण होतं. वरवर शौर्याच्या गप्पा मारणाऱ्या या आडदांड माणसाच्या पोटात कुठं तरी निश्चितच भीती होती.

एका संध्याकाळी गिऱ्हाईकांची गर्दी नसतांना कॅप्टनच्या पोटात होतं, ते ओठावर आलं. त्यादिवशी कॅप्टन रमचे पेल्यामागून पेले घशाखाली रिचवत होता. त्याचं ते पिणं बघून मलाच भीती वाटू लागली. रमचा एक मोठा पेला घशाखाली ढकलल्यावर त्यानं मला खूण करून जवळ बोलावलं. मला तर भीतीच वाटली. पण आता इलाजच नव्हता. कॅप्टननं एकदा त्याच्या बटबटीत डोळ्यांनी माझ्याकडं पाहिलं. मग तो म्हणाला,

'तू मोठा हुशार मुलगा दिसतोस. नाव काय म्हणालास तुझं ?--- जिम ! जिम नाही का तू ? अगदी बरोबर. तर जिम पोरा, तू चांगला मुलगा आहेस. तू जर माझं एक काम केलंस तर मी तुला चार पेनी बक्षिसही देणार आहे.'

चार पेनी ? मी चकीतच झालो.

रम जास्त झाल्यामुळं कॅप्टन शुध्दीवर नसावा असं मला वाटलं.

फावड्याएवढे रुंद असलेले तळहात हवेत फेकत कॅप्टन म्हणाला,

'मी काय सांगतो ते लक्ष देऊन ऐक. तुमच्या इथं खानावळीत फारशी गर्दी नसली, तरी अनेक अनोळखी माणसं येत असतात. त्यांच्यावर तू चांगली नजर ठेवत जा. आणि जर केव्हा एकच पाय असलेला कुणी प्रवासी आला, तर मला ताबडतोब वर्दी दे. समजलं ? एका पायाचा प्रवासी . एका काखेत कुबडी घेणारा !'

आता मला त्याचं रहस्य कळलं. कुणालाही माहीत नसलेलं कॅप्टनचं रहस्य. या लंगड्याला कॅप्टन भीत होता तर ! तो कोण होता कुणास ठाऊक. पण त्या लंगड्या माणसाची भीती खरोखरच कॅप्टनच्या मनात होती. आणि भीतीपोटीच तो रमच्या बाटल्या घशाखाली रिचवायचा. लंगड्याच्या अनामिक भीतीनं तो केव्हातरी शून्यात नजर लावून बसत असे. पण हा भीतीचा झटका त्याला सकाळी किंवा दुपारीच यायचा. संध्याकाळ झाली की आमच्या खानावळीत अनेक दारुबाज यायचे. त्यात नावाडी आणि खलाशी यांचा भरणा भरपूर असे. लंगड्याच्या भीतीनं शेळी झालेला कॅप्टन या खलाशांसमोर एकदम वाघ व्हायचा. मोठमोठ्या गर्जना करत तो नेहमी फुशारकी मारायचा.

खलाशी आणि नावाडी मनोरंजन म्हणून ऐकत बसायचे. पण मला मात्र हसू यायचं. काही का असेना, कॅप्टननं लोकांना थोडं घाबरून सोडलं होतं एवढं खरं. इतर सगळेजण कॅप्टनला टरकून असत.

त्याच्या थापा माझ्या बरोबर लक्षात येत असत. कॅप्टनच्या सगळ्या गोष्टी लुटालूट, जाळपोळ, खून, मारामाऱ्या यापलिकडं जात नसत.

कॅप्टन हसला की भोवतीच्या लोकांना सक्तीनं हसावं लागायचं. नाहीतर कॅप्टनचा पारा चढायचा. त्यांना तो शिव्याशाप द्यायचा. सुरा उचलून खुनाची धमकीही देत असे. तरी सुध्दा कॅप्टनच्या पैशानं रम प्यायला मिळते, म्हणून आमच्या खानावळीत गर्दी व्हायची.

रंगात आला की कॅप्टन भसाड्या आवाजात गाणं म्हणायचा,

**'चौदा कुत्री - मेलेल्या खलाशाच्या पेटीवर**<br>
**यो - हो - हो - रमची एक बाटली**<br>
**सैतान बसला उरलेल्यांच्या छातीवर**<br>
**यो - हो - हो - रमची एक बाटली '**

आपल्याला माणसं घाबरतात, हे लक्षात आल्यावर तर कॅप्टनचं चांगलंच

फावलं. त्याच्या धमक्या वाढू लागल्या. परिणामी सुरवातीला केवळगंमत म्हणून खानावळीत येणाऱ्या गिऱ्हाईकांची संख्या कमी व्हायला लागली.

अगोदरच आजारी असलेले माझे वडील या घटनेनं अक्षरशः हबकून गेले. त्यांची प्रकृती अधिकच ढासळली. मी आणि माझी आई तर घाबरूनच गेलो होतो. कारण गिऱ्हाईकांची वर्दळ अशी थांबली, तर आमच्या कुटुंबावर उपाशी मरायची पाळी होती.

या अवघड प्रसंगात डॉ. लिव्हसे अक्षरशः देवासारखे आमच्या मदतीला धावून आले.

एके दिवशी संध्याकाळी नेहमीप्रमाणं कॅप्टनचा धांगडधिंगा चालला होता. त्याचवेळी डॉ. लिव्हसे त्यांच्या एका मित्राबरोबर खानावळीत आले.

चाललेला प्रकार त्यांनी एकदा पाहिला आणि काहीही न बोलता एका कोपऱ्यातील टेबलाजवळ आपल्या मित्राबरोबर ते गप्पा मारत बसले.

कॅप्टन भसाड्या आवाजात गात होता. घाबरलेले खलाशी त्याला साथ देत होते. अचानक कॅप्टन किंचाळला,

'खामोष ! चूप बसा. कुणी एक शब्द काढेल तर खबरदार !'

खानावळीत एकदम शांतता पसरली. डॉ. लिव्हसे मात्र हलक्या आवाजात त्यांच्या मित्राबरोबर गप्पा मारत होते.

'अजून कोण बोलतोय तो ---' एक मोठी शिवी हासडून कॅप्टन ओरडला.

डॉ. लिव्हसे यांनी कॅप्टनकडं तरीही लक्ष दिल नाही. आता मात्र कॅप्टनचं डोकंच फिरलं. कमरेचा सुरा उपसून तो डॉ. लिव्हसे यांच्यावर धावला. खलाशांची बोबडी वळली. आईनं किंकाळी फोडली. बाबांना तर भोवळच आली आणि भीतीनं माझा घसा कोरडा पडला होता.

वाटेतल्या खुर्च्या लाथेनं उडवत कॅप्टन डॉ. लिव्हसे यांच्याजवळ पोचला. सुरा परजत आणि डोळे गरगरा फिरवत तो ओरडला,

'चूप बैस, नाहीतर छाटून टाकीन.'

डॉ. लिव्हसे यांनी कॅप्टनकडं एकदा वळून पाहिलं. त्यांच्या नजरेत थंड जरब होती. मला ती लांबूनही जाणवली. डॉ. लिव्हसे यांच्या त्या थंड नजरेनं कॅप्टनची निम्मी हवा झटक्यात निघाली.

एकेका शब्दावर जोर देत डॉ. लिव्हसे म्हणाले,

'समुद्रावरच्या कळकट डुकरा, आता तू जर गप्प बसला नाहीस, तर मी तुला फासावर दिलंच म्हणून समज. या गावाचा एक जबाबदार अधिकारी या नात्यानं मी तुला सांगतो आहे. जहाजावर उपाशी असलेल्या खलाशांना भीती घालण्याच्या तुझ्या युक्त्या इथं यशस्वी होणार नाहीत.

'आणखी एक गोष्ट लक्षात ठेव. तुझ्याबद्दल एक जरी तक्रार माझ्याकडं आली, तरी मी पुढच्याच क्षणी तुला हातापायात बेड्या ठोकून तुरुंगात पाठवीन. इथं राहायचं असलं, तर सभ्य माणसासारखं राहावं लागेल. माझ्या गावात धांबडधिंगा चालायचा नाही.'

शब्द मोजकेच, पण त्या शब्दांचा असा परिणाम झाला की हवा गेलेल्या फुग्यासारखी कॅप्टनची अवस्था झाली. काय बोलावं, तेच कॅप्टनला सुचेना. पाय आपटत तो त्याच्या खोलीकडं गेला. मान खाली घालून.

डॉ. लिव्हसे यांनी दम दिल्यावर कॅप्टनचा नक्षा उतरला खरा, पण त्यानं आम्हाला वेगळ्याच पध्दतीनं त्रास द्यायला सुरवात केली. खानावळीचं तो भाडंच भरेना. आम्ही वैतागून गेलो. सुरवातीला वाटलं की पैसे देत नाही, त्याअर्थी लवकरच तो खानावळ सोडून जाणार. पण तेही घडेना.

डॉ. लिव्हसे यांच्याकडं तक्रार न्यावी, तरी पंचाईतच होती. न जाणो, या माथेफिरु माणसानं आमच्यापैकी कुणावर सुरा चालवला तर ?

अशाच तणावाखाली आणखी काही दिवस गेले. जानेवारी महिना उजाडला आणि हिवाळ्याची तीव्रता वाढली. एका सकाळी मी खानावळ साफ करत असतांना पिवळसर रंगाचा एक घाणेरडा खलाशी आमच्या खानावळीच्या दाराशी येऊन उभा राहिला. आश्चर्य म्हणजे त्याच्या डाव्या हाताला दोन बोटंच नव्हती. कित्येक दिवसात त्यानं अंगावरचे कपडेही बदलले नसावेत. मला तर त्या माणसाची घृणाच आली.

त्या माणसानंही माझ्याकडं खुनशी नजरेनं पाहिलं. कमरेचा सुरा उपसून एका खुर्चीवर बसकण मारून त्यानं रम मागवली. माझ्याकडं बघत म्हणाला,

'माझा मित्र बिल कुठाय् ? त्या अंधाऱ्या कोपऱ्यात बसणारा ? बिल, माझा मित्र !'

'कोण ? तुम्हाला कॅप्टन म्हणायचं आहे का ? कॅप्टन बाहेर गेलाय्. तो इतक्यात येईलच.'

आपले पिवळे दात दाखवत खलाशी हसला. म्हणाला,

'मग मला थांबलंच पाहिजे. मला बघून बिलला केवढा आनंद होईल.'

थोड्याच वेळात कॅप्टन बाहेरुन परतला. आणि त्या खलाशाला बघून दचकलाच. तो एकदम ओरडला,

'कोण ? तू ? ब्लॅक डॉग ? शेवटी मला तू शोधलंस तर--- बोल, कशासाठी आलास तू इथं ?'

'सांगतो,' तो खलाशी गुरगुरला, 'पण या पोरासमोर नको. आपण बाहेरच्या खोलीत जाऊ या.'

पलिकडच्या खोलीत जाऊन दोघंही अगदी हलक्या आवाजात काहीतरी बोलत होते. मी कान देऊन ऐकण्याचा प्रयत्न केला. पण मला अक्षरही कळलं नाही. अचानक कॅप्टन गरजला,

'मला फासावर देण्याच्या गप्पा तू कशाला करतोस ब्लॅक डॉग ? कारण तुमच्यापैकी कुणीही असा प्रयत्न केला, तर आपण सगळेच फासावर जाऊ.'

कॅप्टनचं वाक्य पुरं होतंय् न होतंय् तोच खुर्च्या फेकल्याचा आवाज ऐकू आला. उडी मारुन मी दाराजवळ गेलो आणि बघतोय तर दोघांची चांगलीच जुंपली होती.

एकमेकांवर दोघंही स्टुलं फेकत होते. सुरे घेऊन एकमेकांवर तुटून पडत होते. शिव्या देत होते. कॅप्टनचं वय जास्ती असलं, तरी त्याला पराभूत करणं, हे ब्लॅक डॉगलाही सहजासहजी जमत नव्हतं.

आपला निभाव लागत नाही, हे लक्षात आल्यावर कॅप्टनच्या नावानं शिव्या देत आणि अंगावरचं रक्त पुसत, ब्लॅक डॉगनं पळ काढला.

शिव्या घालत कॅप्टननं ब्लॅक डॉगच्या दिशेनं एक दोन खुर्च्या फेकल्या. मग त्याचं माझ्याकडं लक्ष गेलं. भीतीनं माझं बर्फच झालं होतं. कॅप्टनही काही कमी घाबरलेला नव्हता. प्रक्षोभानं त्याचं सगळं शरीर थरथर कापत होतं. अंगावर रक्ताचे डाग होते. त्याच्या चेहऱ्यावरून घामाचे ओघळ वाहात होते.

'बघतोस काय जिम ?', तो किंचाळला, 'पळ, लवकर रम आण मला.'

मी तसाच धावलो. काचेचा मोठा ग्लास मी भरत असतानांच माझ्यामागं धाडकन् आवाज आला. दचकून मी मागं वळून पाहिलं.

चेहरा वेडावाकडा झालेला आणि छातीवर हात दाबून धरलेला कॅप्टन

फरशीवर अस्ताव्यस्त पडला होता. त्याचे बटबटीत डोळे आणखीनच बाहेर आले होते.

विजेचा धक्का बसावा, तसं मला झालं आणि माझ्या हातातून काचेचा ग्लास सुटला. खळकन् आवाज करत काचांचे तुकडे सगळीकडं पसरले.

आणि मी मात्र आऽ वासून कॅप्टनकडं बघत उभा राहिलो.

* * *

## २. धुमश्चक्री

माझ्या सुदैवानं बाजारात गेलेली आई यावेळी खानावळीत परतली. समोरचं दृश्य पाहिलं मात्र, तिच्याही पायांना कापरं भरलं.

'अरे देवा', ती किंचाळली, 'कॅप्टन तर मरू घातलाय आणि तुझे वडील तर आजारी आहेत. हा जर असा मेला तर आपल्या खानावळीत कोण येईल ?'

'आई, तू घाबरू नकोस. मी आता डॉ. लिव्हसे यांना बोलावतो', मी आईला धीर देत म्हटलं आणि रस्त्यावर धावलो.

आमचं नशीब असं की नेमक्या याचवेळी डॉ. लिव्हसे घोड्यावर बसून खानावळीवरून जात होते. घोड्याच्या टापांखाली रस्त्यावरचा बर्फ इतस्ततः उडत होता.

मी त्यांच्याकडं धावलो आणि झालेली घटना त्यांच्या कानावर घातली.

प्रसंगाचं गांभीर्य त्यांच्या लक्षात आलं. आमच्या खानावळीकडं त्यांनी घोडा लगेच वळवला. खानावळीतल्या इतर लोकांच्या मदतीनं कॅप्टनचा तो अवाढव्य देह त्यांनी खोलीत नेला.

डॉ. लिव्हसे यांनी कॅप्टनला तपासलं. मग आईकडं वळून ते म्हणाले,

'मिसेस हॉकिन्स, तुम्ही अजिबात काळजी करू नका. या कळकट माणसाला हृदयविकाराचा सौम्य झटका आला आहे. याच्या अंतःकरणात हृदय आहे, याचंच मला आश्चर्य वाटतंय. आठवड्याभरात बरा होऊन जाईल हा. ---पण आणखी रम पिण्याचा यानं प्रयत्न केला, तर मात्र हा संपलाच म्हणून समजा.'

जाण्यापूर्वी डॉक्टर माझ्या वडिलांना भेटले. त्यांचं काय बोलणं होतंय, ते

ऐकण्याची मला अतिशय उत्सुकता होती. दाराला कान लावून मी ऐकू लागलो.

'मिस्टर हॉकिन्स, आता कशी आहे तब्येत तुमची ?'

'डॉक्टर, या आजारातून मी उठेन असं मला वाटत नाही. या बारीक तापानं माझी शक्ती खलास झालीय्. समुद्राकाठची ही हवा मला अजिबात मानवेनाशी झालीय्.'

'मि. हॉकिन्स, तुम्ही धीर सोडू नका. नियमित औषध घेतलंत, तर लवकरच बरे व्हाल.'

काही क्षण शांततेत गेले. मग डॉक्टर हलक्या आवाजात म्हणाले,

'मि. हॉकिन्स, तुमच्या खानावळीत आलेल्या कॅप्टनला हृदयविकाराचा सौम्य झटका आलेला आहे.'

'होय, तुम्ही इथं माझ्या खोलीत येण्यापूर्वी माझ्या पत्नीनं ही बातमी मला सांगितली.'

'मी त्याला आत्ताच तपासला. काही विलक्षण गोष्टी माझ्या ध्यानात आल्या आहेत.'

'कोणत्या ?'

'कॅप्टनच्या दोन्ही हातावर गोंदण आहे. बऱ्याच गोष्टी गोंदलेल्या आहेत. डाव्या हातावर एका मुलीचं चित्र गोंदलं आहे आणि कॅप्टनचं नावही. त्याचं नाव आहे-बिली बोन्स.'

'माय गॉड !', माझे वडील किंचाळले', तो तर भयानक लुटारू होता.'

'होय, तोच आहे हा. समुद्रावर जहाज लुटणारा प्रख्यात चाचा ! त्याला फासावर चढवलं, तरी ती शिक्षा कमीच ठरेल.'

डॉ. लिव्हसे जायला उठल्यावर मी धुम ठोकली. कॅप्टनची बरीचशी रहस्यं आता मला समजली होती. खानावळीतून बाहेर पडण्यापूर्वी डॉक्टरनी कॅप्टनसाठी काही औषधं आईजवळ ठेवली.

तासा - दोन तासांनी कॅप्टनला औषध देण्यासाठी मी त्याच्या खोलीत गेलो. कॅप्टन आता चांगला शुध्दीवर आला होता. डोळे गरगरा फिरवत, पण क्षीण स्वरात त्यानं विचारलं,

'जिम, मला काय झालंय ? मगाशी मी उठायचा प्रयत्न केला, पण अंगातली ताकदच गेलीय्.'

'होय, तुम्हाला बरं नाहीय्.'

'अस्सं ? किती दिवस मला हे असं पडून राहावं लागणार आहे ?'

'किमान एक आठवडा तरी ! निदान डॉ. लिव्हसे तरी तसं म्हणाले. तुमच्यासाठी मी हे औषध आणलंय.'

'खड्ड्यात गेला तुझा तो डॉक्टर ! त्याचं ते औषध उकिरड्यावर फेकून दे. म्हणे एक आठवडाभर पडून राहावं लागेल मला. काय कळतंय तुझ्या डॉक्टरला ? जिम, पळ आणि माझ्यासाठी लगेच रम घेऊन ये.'

एवढं बोलतांनाही कॅप्टनला धाप लागली.

'छे !छे ! रम कसली ? रम घेतलीत, तर तुमचा जीवच जाईल.'

'गेला तर गेला. इथं कोण रडणार आहे माझ्यासाठी ?'

तरीही मी जागचा हललो नाही. कॅप्टन धडपडत उठून बसला. केविलवाणं हसून मला डोळा घालत म्हणाला,

'जिम, तू शहाणा मुलगा ना ! डॉक्टरला काय कळतंय तुझ्या ? मला काय पाहिजे आहे, ते मला अगदी बरोबर माहीत आहे. जा पळ- रम घेऊन ये.'

आता माझा नाईलाजच झाला. त्यातूनही मला भीती वाटत होती की हा कॅप्टन संतापला तर काय करायचं ? त्यातच त्याचा जीव जायचा. त्यापेक्षा रम दिलेली बरी. मी कॅप्टनला मोठा ग्लास भरून रम दिली. कॅप्टननंही अधाशीपणानं ती घटाघटा पिऊन टाकली. मग तो स्वतःशीच बडबडायला लागला.

'एक आठवडा ? एक आठवडा मी इथं पडून राहायचं ? आणि तेवढ्यात माझे दावेदार इथं आले म्हणजे ? म्हणजे मी चांगलाच तावडीत सापडेन. अगदी ब्लॅक स्पॉट--- पण मी काही इतका मूर्ख नाही. बघता बघता फसवेन सगळ्यांना--- ब्लॅक स्पॉट -- ब्लॅक स्पॉट !'

तो काय बडबडतोय हे मला नीटसं कळलं नाही. तरीही मी त्याला विचारलं,

'कॅप्टन, ब्लॅक स्पॉट म्हणजे काय ?'

कॅप्टन क्षीण हसला. म्हणाला,

'योग्य वेळ आली की मी तुला सगळं सांगेन पोरा. --- तू --- तू ब्लॅक डॉगला पाहिलंस नाही का ? माझी त्याच्याबरोबर चांगलीच जुंपली होती.'

मी होकारार्थी मान हलवली. कॅप्टन हलक्या आवाजात म्हणाला,

'जिम, आता मी काय सांगतो ते ऐक. नीट लक्ष देऊन ऐक. मी तुला आता एक

रहस्य सांगणार आहे. आणि कारट्या, तू ते जर कोणाला सांगितलंस, तर सत्यानाश होईल तुझा.'

'मी कुणालाच काही सांगणार नाही', मी घाबरून बोललो.

कॅप्टननं समाधानानं मान हलवली. तो म्हणाला,

'ब्लॅक डॉग इथं येऊन गेला म्हणजे लवकरच माझे शत्रूही इथं येणार. मला पकडण्यासाठी त्यांची सगळी धडपड चालली आहे. ब्लॅक डॉग, एका पायाचा लंगडा आणि इतर खलाशी आता येणारच.'

आलेला शीण घालवण्यासाठी कॅप्टननं थोडासा विसावा घेतला. थोड्या वेळानं तो म्हणाला, 'कॅप्टन फ्लिटचं नाव ऐकलयंस तू ? बाकी तू कुठून ऐकणार म्हणा ? कॅप्टन फ्लिट म्हणजे एक महाभयंकर चाचा होता. त्याचं नाव ऐकलं की, मी मी म्हणून फुशारकी मारणारे बहाद्दरही चळचळा कापायचे. त्याचं वॅलरस जहाज प्रख्यात होतं. त्यावर सुकाणू धरायचं काम मी करायचो.'

कॅप्टन बोलताना धापा टाकत होता. बाहेर अंधारून आलं होतं आणि कॅप्टनची चित्तरकथा ऐकताना मलाही आता कापरं भरलं होतं.

'तर मी तुला काय सांगत होतो जिम ? हांऽ--- कॅप्टन फ्लिट ! मृत्यूलाही धाक घालणारा फ्लिट- तोही एक दिवस मेला. तो मेला त्यावेळी जहाजावरील सगळ्या खलाशांपैकी फक्त मीच त्याच्याजवळ होतो.'

माझा मेंदू आता वेगानं काम करत होता.

मी कॅप्टनला म्हटलं,

'पुढं काय झालं, ते मी सांगतो. कॅप्टन फ्लिटची पेटी तू पळवलीस. तीच पेटी घेऊन तू आमच्या खानावळीत राहण्यासाठी आला आहेस.'

कॅप्टनचे डोळे विस्फारले. तो पुटपुटला,

'कारट्या, मी समजतो त्यापेक्षा तुझं डोकं चांगलं चालतं की रे ! होय, मी पेटी पळवली. कॅप्टन फ्लिटच्या खलाशात ब्लॅक डॉग आणि तो लंगडाही होता. कॅप्टन फ्लिटच्या मृत्यूनंतर ते माझ्या मागं धावताहेत. जिम, या खतरनाक लोकांपैकी जर कुणी आपल्या खानावळीकडं येताना दिसलं, तर घोड्यावर बसून ही बातमी देण्यासाठी तू सूटच.'

'कुणाला ? डॉ. लिव्हसेना ?'

'होय. आणखीही कोणी अधिकारी असतील, तर त्यांनाही. त्यांच्याबरोबर

बेलीफ, पोलीस आणि कोर्टाचे अधिकारीही आले पाहिजेत. माझ्या शोधासाठी येणारी सगळी मंडळी दरोडेखोर आहेत. पोलिस त्यांच्या शोधात आहेत.'

'पण त्या पेटीत काय आहे ?', मी औत्सुक्यानं विचारलं.

'पोरा, ते तुला सांगून काहीच उपयोग होणार नाही. पण हे---हे मी जे बोललो, त्यापैकी तू कुणालाच काही सांगणार नाहीस याचं मला वचन दे.'

'मी कुणालाच काही सांगणार नाहीऽ पण---'

माझे शब्द ऐकण्यापूर्वीच कॅप्टनला श्रमामुळं ग्लानी आली होती. आणि काही क्षणातच त्याला झोप लागली व तो घोरायलाही लागला. आजारी कॅप्टनला झोप लागली. पण त्यानं माझी झोप उडवली. त्यानं सांगितलेल्या गोष्टी ऐकून माझ्या मेंदूत समुद्रावरच्या खलाशांनी फेर धरला. या गोष्टी मी कुणालाही सांगायच्या नाहीत, असा दम मला कॅप्टननं दिला होता. त्यामुळं मी अधिकच अस्वस्थ झालो. हा सगळा प्रकार मी आईलाही सांगायचा नाही म्हणजे फारच झालं. कुणाला तरी हे सगळं सांगितलंच पाहीजे ---

--- मी हा विचार करत असताना अचानक आईची किंकाळी माझ्या कानावर आली. मी तीरासारखा वडिलांच्या खोलीकडं धावलो. आई अक्षरशः थरथरत होती.

वडिलांची प्रकृती पार ढासळली होती. जणू त्यांना शेवटची घरघर लागली असावी. मी धावत जाऊन डॉ. लिव्हसेना घेऊन आलो. डॉक्टरांनीही प्रयत्नांची शर्थ केली. पण त्याचा काहीही उपयोग झाला नाही आणि वडिलांनी डोळे मिटले, ते कायमचे.

मी पोरका झालो. आईनं तर रडून रडून डोळे सुजवून घेतले. अवघड प्रसंगी आमच्या खेडयातली माणसं मदतीला धावून आली. त्यांनीच वडिलांचं दफन केलं.

त्या दोन-चार दिवसात कॅप्टनचं नावही मी विसरून गेलो होतो. मग माझ्या लक्षात आलं. कॅप्टन या कालावधीत खडखडीत बरा झाला होता. आता तो खोलीतून बाहेर येऊन बसायचा आणि आश्चर्य म्हणजे पोटभर रम ढोसायचा. म्हणजे डॉ. लिव्हसेनी केलेला अंदाज चुकला तर ! रम पिऊनही या कॅप्टनची प्रकृती अजून ठणठणीतच. पुन्हा त्याच्या गप्पा तशाच सुरूझाल्या होत्या. तशीच गाणी. तसेच खलाशी मित्र. एके दिवशी तो मित्रांना रमचे पेले भरून देत होता. त्याची भसाड्या अवाजातली गाणी रंग भरत होती. खलाशी गदगदा हसत होते.

इतक्यात खानावळीबाहेरून आवाज आला,

‘इंग्लंडच्या राजासाठी युध्द करताना माझे डोळे गेले. आंधळ्याला कोणी रस्ता दाखवेल का हो ?’

- त्या गदारोळात मी आंधळ्याचे शब्द ऐकले आणि धावत बाहेर गेलो. बिचारा आधंळा- त्याला मदत तरी करावी.

बाहेर उभ्या असलेल्या आंधळया माणसाची अवस्था दयनीय होती. फाटके कपडे, वय झालेलं, हातात मोडकी काठी.

त्याचा हात हातात घेऊन मी म्हटलं,

‘बाबा, चला, मी रस्ता दाखवतो. कुठं जायचं तुम्हाला ?’

पण उत्तर येण्याऐवजी त्या आंधळ्यानं माझा हात असा पकडला की वेदनेनं माझा जीव कळवळला. लोखंडी पकडीत हात चेंगरावा तशी माझी स्थिती झाली.

खदखदा हसत तो आंधळा म्हणाला,

‘ पोरा, आता मला कॅप्टन बिलकडं घेऊन चल. आणि तोंड बंद ठेव. गडबड केलीस, तर तुझ्या हाताचे दोन तुकडे करीन मी’.

माझा हात अशा पोलादी पकडीत होता की, त्याबद्दल माझी खात्रीच पटली. वेदना होत असतांनाही न बोलता मी त्या आंधळ्याला कॅप्टनपुढं आणलं आणि त्याचा हात कॅप्टनच्या हातात दिला.

त्या आंधळ्यानं कॅप्टनचा हात आपल्या हातात घेतला तो काही सेकंदापुरताच. मग विजेचा धक्का बसावा, त्याप्रमाणं तो एकदम बाजूला झाला आणि डोळस माणसाप्रमाणं झपाट्यानं खानावळीच्या बाहेर गेलाही.

आता कॅप्टनही खाडकन् उभा राहिला. बहुधा त्याची दारू उतरली असावी. अचानक तो किंचाळला,

‘ जिम, ब्लॅक स्पॉट ! माझ्या दावेदारांनी शेवटी माझा ठावठिकाणा शोधलाच. आता काही तासातच ते इथं येतील. फक्त पाच-सहा तासातच. जिम--- त्या आंधळयाला आडव. नाहीतर मीच त्याचा समाचार घेतो.’

असं म्हणून कॅप्टननं दरवाजाच्या दिशेनं दोन पावलं टाकली असतील नसतील, तोच त्याचा चेहरा एकदम वेडावाकडा झाला आणि डॉ. लिव्हसे यांचं निदान अचूक ठरलं.

अचानक कॅप्टनच्या छातीतून जीवघेणी कळ आली. डोळे गरागरा फिरवून किंकाळी फोडत कॅप्टन खाली कोसळला. त्याच्याकडं एक दृष्टीक्षेप टाकल्यावर

माझ्या लक्षात आलं — हा संपला. कॅप्टनच्या आयुष्याचा शेवट झाला आहे.

खलाशांनी हांऽ हांऽ म्हणता खानावळीतून पळ काढला. थरकाप झालेला मी मात्र अस्वस्थपणे कॅप्टनच्या निर्जिव, पण अवाढव्य देहाकडं बघतच राहिलो. पण काही क्षणातच माझ्या लक्षात आलं.

कॅप्टनचे शत्रू थोड्या वेळात इथं येणार. म्हणजे माझी आणि आईची अजिबात धडगत नाही. कापऱ्या स्वरात सगळा प्रकार, कॅप्टनच्या रहस्यासकटमी आईच्या कानावर घातला. ते ऐकून आईही घाबरणार असं मला वाटलं होतं. पण तिनं सगळी कथा शांतपणे ऐकून घेतली. थोडा वेळ विचार करून ती म्हणाली,

' जिम, हे सगळं तू डॉ. लिव्हसेना जाऊन सांग. म्हणजे ते पुढची व्यवस्था करतील.'

' पण कॅप्टनच्या त्या लाकडी पेटीचं काय करायचं ?', मी विचारलं.

आईनं क्षणभर विचार केला आणि म्हणाली,

' हो ! मी तर ते विसरलेच होते. तू अगोदर डॉक्टरना निरोप तरी देऊन ये. मग आपण पेटी उघडूया.'

हरणाच्या गतीनं मी डॉक्टरांना निरोप सांगून आलो आणि आईच्या मदतीने पेटी उघडली. आत अनेक निरर्थक गोष्टी होत्या. पण पैसेही होते.

' कॅप्टनचं थकलेलं बिल तेवढं घेऊ या', आई म्हणाली. पण मी मात्र पैशाची सगळी थैलीच उचलली. इतक्यात गडबड झाली. बुटांचे आणि माणसांच्या ओरडण्याचे आवाज ऐकू आले. आंधळ्या माणसाचा आवाज त्या सगळ्या आरड्याओरड्यात मी अचूक ओळखला. भीतीनं माझं काळीज हललं.

'आई, पळ', मी ओरडलो.

खानावळीच्या दारावर आता धडकाही बसायला लागल्या होत्या. पेटीच्या तळाशी असलेली पिशवी उचलून मी मागच्या दाराकडं पळत सुटलो.

तोपर्यंत खानावळीचा दरवाजा ब्लॅक डॉगनं तोडला होता.

डॉ. लिव्हसे पोलिसांना घेऊन त्याच क्षणी खानावळीकडं आले नसते, तर आमची धडगतच नव्हती. आल्याबरोबर त्यांची खलाशांबरोबर जुंपलीच आणि गोळीबाराला सुरुवात झाली. धुरानं खानावळ भरून गेली.

डॉ. लिव्हसे आणि पोलिस आलेले आहेत, असं म्हटल्यावर खलाशांनी पळ काढला. एक दोघेजण जबर जखमी झाले. त्या आंधळ्याच्या देहाची गोळ्यांनी

चाळण झाली. आऽ वासलेला त्याचा मृत देह बर्फात पडला.

अर्ध्या तासात सगळं सामसूम झालं. कपाळावरचा घाम पुसत उमराव ट्रेलॉने म्हणाले,

‘ हे लुटारू चाचे इथं येण्याचं कारणंच काय ? केवळ कॅप्टनला मारण्यासाठी ते इथं येतील, असं मला वाटत नाही.’

ट्रेलॉने आणि डॉक्टर यांनी कॅप्टनची पेटी तपासली. पण त्यात थोड्या पैशाशिवाय काहीच नव्हतं.

‘ जिम, तुझ्या हातात काय आहे ?’, डॉक्टरांनी मला एकदम प्रश्न केला.

ती पिशवी पेटीतलीच आहे, हे मी पार विसरून गेलो होतो. काहीही न बोलता ती पिशवी मी डॉक्टरांकडं दिली. औत्सुक्यानं त्यांनी ती उघडली. ट्रेलॉने यांनी आतून एक कागद बाहेर काढला. तो एक जुना नकाशा होता. डॉक्टरनी नकाशा टेबलावर पसरला. त्या नकाशावर डोंगर, दऱ्या, नद्या यांची चित्र होती. मला अजिबात न कळणाऱ्या खुणाही त्यावर होत्या.

अचानक डॉ. लिव्हसे ओरडले,

‘ माय गॉड ! हा नकाशा आपल्याला खजिन्याच्या बेटाकडं नेणारा आहे. कॅप्टन फ्लिंटनं त्याची अपरंपार संपत्ति कुठं पुरून ठेवली आहे, हे दाखवणारा हा नकाशा आहे.’

ते ऐकून मी तर थरारलोच, पण उमराव ट्रेलॉने सुध्दा विस्फारलेल्या डोळ्यांनी आऽ वासून त्या नकाशाकडं बघतच राहिले.

काळ-वेळेचं भान नसलेले आम्ही, कितीतरी वेळ एकमेकांकडं बघतच राहिलो. त्याही अवस्थेत मोठा ठेवा गवसल्याची जाणीव मला होत होती.

* * *

अ. भ. ग. ठाणे, ... शाखा.
... - पुस्तक ...
... 2109 ...
विषय का. वा.- ...

# ३. बंड

डॉ. लिव्हसे आणि ट्रेलॉने यांना आता त्या नकाशाशिवाय दुसरा विषयच नव्हता. रात्री उशिरापर्यंत दोघंही त्या नकाशाचा बारकाईनं अभ्यास करत होते. तो नकाशा अमूल्य होता आणि त्या नकाशात एकही चूक नव्हती, हे दोघंही पुन्हा पुन्हा म्हणत होते.

पहाटेचे दोन-तीन वाजले असावेत. अचानक उमराव ट्रेलॉने उभे राहिले आणि म्हणाले,

'मी एक योजना आता नक्की केली आहे. मी उद्या ब्रिस्टलला जाणार आणि एक जहाज विकत घेणार. दोन तीन आठवड्यात जहाज तयार होईल. तीन कशाला-दोनच आठवडे म्हणा ना . मग आपण सगळेजण खजिन्याच्या बेटावर जायचं आहे. डॉक्टर तुम्ही माझ्याबरोबर येणार आहात आणि जिमही ! मोठा चलाख मुलगा आहे. तो चांगला केबिन-बॉय होईल. ठरलं तर हे सगळं !'

आश्चर्यानं मी थक्कच झालो. माझा आऽ वासलेला जबडा मिटेचना. डॉ. लिव्हसेही आश्चर्यचकित झाले.

'उमरावसाहेबऽ हे कसं काय शक्य आहे ? माझा दवाखाना, या जिमची खानावळ आणि --- ', डॉक्टरनी ट्रेलॉने यांचं म्हणणं खोडण्याचा प्रयत्न केला.

'ठरलं म्हणजे ठरलं', उमराव ट्रेलॉने ओरडले, 'प्रवासाहून परत येईपर्यंत तुमच्या दवाखान्याचं जे नुकसान होईल, ते भरून देण्याची जबाबदारी माझी. आता या जिमची ही खानावळ आहे, ती भलतीच जुनाट झालीय्. रंगरंगोटी करून ती मी नवीन करणाराय् आणि जिम परत येईपर्यंत त्याच्या आईच्या मदतीसाठी विश्वासू

नोकर मीच पाठवणार. आता बोला, काय अडचण आहे ते !'

डॉक्टरना काही बोलताच येईना. उमराव ट्रेलॉने विजयी स्वरात म्हणाले,

'तेव्हा आता काहीही अडचण नाही, कसं ? मी उद्या ब्रिस्टलला जातो. आणि जहाजाची व्यवस्था करतो. डॉक्टर, तुम्हाला काही कामं पुरी करण्यासाठी लंडनला जावं लागेल.'

डॉक्टरनी काहीही न बोलता संमतीदर्शक मान डेलावली.

उमराव पुढं म्हणाले,

'मी परत येईतोपर्यंत हा जिम खानावळीतच राहील. प्रवासात माझ्या काही विश्वासू नोकरांना मी बरोबर घेणार आहे.'

'कोण ?' मी आगाऊपणानं विचारलं.

उमरावांनी हास्याचा गडगडाट केला. ते म्हणाले,

'जिम, त्यांची नावं लक्षात ठेव - रेडरूथ, जॉयस आणि हंटर--- पण जिम तू - आणि डॉक्टर तुम्हीही एक गोष्ट लक्षात ठेवा- आपल्या प्रवासाची बातमी कुणालाही सांगायची नाही. अगदी गुप्त राहिली पाहिजे ती.'

'तुम्हीच जरा काळजी घ्या या बाबतीत', डॉक्टर पुटपुटले. उमरावांची गप्पा मारायची सवय डॉक्टरांनाच काय पण मलाही माहीत होती.

उमराव ट्रेलॉने ब्रिस्टलकडं रवाना झाले. आणि डॉक्टर लंडनकडं. मी मात्र खानावळीत राहिलो. एकेक दिवस मला वर्षासारखा वाटायला लागला. रात्री मला नीट झोप यायची नाही आणि आलीच, तर समुद्रावरच्या प्रवासाची स्वप्नं बघून मी दचकून जागा होत असे.

तब्बल तीन आठवडे झाल्यावर डॉक्टर आणि उमराव ट्रेलॉने यांची पत्रं आली. मी ब्रिस्टलला यावं, म्हणून त्यात आदेश होता. मला हर्षवायू व्हायचा तेवढाच बाकी राहिला. आईच्या मदतीसाठी पाठवलेला नोकरही खानावळीत दाखल झाला होताच. मला आता प्रवासाला निघण्यात कोणतीच अडचण नव्हती.

मी प्रवासाला निघालो, तसं आईच्या डोळ्यात पाणी उतरलं. माझ्या कपाळाचं चुंबन घेऊन ती म्हणाली,

'जिम, जपून राहा.'

माझं मन आता समुद्राकडं धाव घेत होतं. ब्रिस्टलमधे मी दाखल झालो. डॉक्टर आणि उमरावांनी माझं स्वागत केलं.

उमराव ट्रेलॉने यांनी एक अवाढव्य पण सुंदर जहाज खरेदी केलं होतं. जहाजाचं नाव होतं-'हिस्पॅनिओला.'

माझ्या खांद्यावर हात ठेवत ट्रेलॉने म्हणाले,

'जिम, जहाज तर झकास मिळालंय आपल्याला ! विश्वासू खलाशी मिळणं मोठं अवघड असतं. पण तो प्रश्नही सुटलाय. आपण भाग्यवान आहोत, त्या बाबतीत.'

'कसं काय ?'

'इथं बंदराजवळच एक खलाशी राहतो. बराच अनुभवी आहे. कुठं तरी समुद्रावरच्या प्रवासात अपघात होऊन त्याचा एक पाय तुटला आहे. लोक त्याला जॉन सिल्व्हर म्हणतात. त्याच्यामुळं आपल्याला हवे असलेले अनुभवी कामगार मिळाले आहेत.'

'पण कॅप्टनचं काय ?'

'पोरा, तू भलताच चलाख दिसतोयस्. पण त्याचीही व्यवस्था झालीय्. कॅप्टन स्मॉलेटनं प्रवासाला आपल्याबरोबर येण्याचं मान्य केलंय्. आणखी एक चांगला नाखवा आपल्याला मिळाला आहे. त्याचं नाव आहे- ॲरो.'

मी मधेच आणखी काहीतरी विचारणार होतो, तेवढ्यात ट्रेलॉने यांनी माझ्या डोक्यावर टप्पल मारून म्हटलं,

'आता मधे बडबडू नकोस. हे पत्र घे आणि जॉन सिल्व्हरला नेऊन दे. त्याची खानावळ अगदी जवळ आहे. तुला सहज सापडेल ती जागा.'

मग मी सुध्दा शहाण्या मुलासारखा चटकन् निघालो. जॉन सिल्व्हरची खानावळ बंदराजवळच होती. आणि खानावळीचं नाव होतं-'दि स्पाय ग्लास.'

मी जॉन सिल्व्हरला पाहिलं मात्र, माझ्या पोटात खड्डाच पडला. त्याला डावा पायच नव्हता. डाव्या काखेत कुबडी घेऊन तो उजव्या पायावर नाचत नाचत सगळ्या खानावळीत फिरत होता.

आमच्या खानावळीत उतरलेल्या कॅप्टननं सांगितलेला हाच तो एका पायाचा खतरनाक शत्रू नसावा ?

जॉन सिल्व्हरला बघून मी धसकलो होतोच. आता मला आणखी एक दणका बसणार होता.

मला बघून खानावळीत जेवण घेणारा एक खलाशी उठला आणि तोंडावर

हॅट ओढत पळालाच. त्यानं तोंड लपवायचा प्रयत्न केल्यामुळं मी त्याला काळजीपूर्वक पाहिलं.--- तो ब्लॅक डॉग होता. सुरा घेऊन कॅप्टनवर हल्ला केलेला.

'ब्लॅक डॉग ?' मी किंचाळलो, 'त्याला पकडा.'

जॉन सिल्व्हरचं माझ्याकडं लक्ष गेलं. त्यानं दोन माणसं ताबडतोब ब्लॅक डॉगच्या मागावर सोडली. आणि ब्लॅक डॉगबरोबर जेवण घेणाऱ्या माणसाची कॉलर पकडून तो गरजला.

'मॉर्गन, कोण होता तुझा मित्र ? बोल !'

भेदरलेला मॉर्गन कसाबसा पुटपुटला,

'देवाशप्पत, मला काहीच माहिती नाही.'

'हं !' सिल्व्हर स्वतःशीच बोलला, 'आता माझ्या लक्षात आलं. मी या माणसाला त्या आंधळ्याबरोबर पाहिलं होतं. च्ऽ च्च्ऽ --- माझ्या हे अगोदरच कसं लक्षात आलं नाही ?'

ब्लॅक डॉगनं मात्र पळ काढला होता. जॉन सिल्व्हरनं पाठवलेली दोन्ही माणसं हात हलवत परत आली.

'जातो कुठं ? केव्हातरी माझ्या हाती सापडेलच', डोळे गरगरा फिरवत जॉन सिल्व्हर म्हणाला, 'काय रे पोरा, तुझं काय काम आहे ?'

काहीही न बोलता मी ट्रेलॉने यांचं पत्र जॉन सिल्व्हरच्या हातात ठेवलं. कपाळाला आठ्या घालत त्यानं ते वाचलं. मग मात्र त्याचा चेहरा पालटला. रुंद हास्य करत तो म्हणाला,

'ठीक आहे जिम. उमरावसाहेबाना सांग - उद्या सकाळी मी माझ्या खलाशांना घेऊन जहाजावर येतो आहे.'

उड्या मारतच मी जहाजावर परतलो. जॉन सिल्व्हरचा निरोप मी ट्रेलॉनेना सांगितला. पण मला वाटत होतं, त्यापेक्षा प्रवास अडचणीचा होणार होता.

त्या रात्रीच आम्हा सर्वांना या गोष्टीची खात्री पटली.

ट्रेलॉने यांना भेटल्यावर कॅप्टन स्मॉलेट म्हणाला,

'उमरावसाहेब, मी जर या जहाजाचा कॅप्टन असेन, तर काही गोष्टींचा मला अगदी स्पष्ट खुलासा केला पाहिजे. मी कॅप्टन असल्यामुळं सगळ्या खलाशांची निवड माझ्या मतानं व्हायला हवी होती. पण तुम्ही परस्परच खलाशी निवडले आहेत.'

'मग ? त्यात काय बिघडलं ?', ट्रेलॉनिनी विचारलं.

'मग काय ?--- आपण खजिन्याचा शोध घेण्यासाठी जाणार आहोत, ही गोष्ट आता जगजाहीर झाली आहे. खलाशी काय लायकीचे असतात, हे मी तुम्हाला वेगळं सांगायला पाहिजे असं नाही. पैशासाठी मारामाऱ्या झाल्या, खून पडले, तर शेवटी तुम्ही मलाच जबाबदार धरणार नाही का ?'

'तुम्हाला काय म्हणायचं आहे ?'

'आपल्यात विश्वास ठेवण्याजोगी किती माणसं आहेत ?'

'आपण तिघं - तुम्ही, मी, डॉक्टर. हा जिम सुध्दा मोठा हुशार आणि विश्वासार्ह आहे. शिवाय माझे तीन नोकरही इमानदार आहेत.'

'म्हणजे एकूण सात --- '

'होय ---'

'आणि जहाजावरचा सगळा दारुगोळा कुठं आहे ?'

'तो खालच्या खलाशांच्या केबिनमधे आहे.'

'अरे देवा, मग तो उद्या सकाळपर्यंत आपल्या डेकवरच्या केबिनमधे आला पाहिजे.'

'पण ---'

'या बाबतीत मी तडजोड करणार नाही. मान्य नसलं, तर दुसरा कॅप्टन बघा.'

ट्रेलॉनि यांना माघार घेण्यावाचून पर्याय नव्हता.

दुसऱ्या दिवशी सकाळी दारुगोळा हलवण्याचं काम चालू असतानाच जॉन सिल्व्हर खलाशांसह हजर झाला.

'हे काय चाललंय ?', तो ओरडला.

'कॅप्टन स्मॉलेटचा तसा हुकूमच आहे.'

'मग ठीक आहे', जॉन सिल्व्हर गुरगुरला, 'जिम इकडं ये. पोरा- तू हुशार आहेस.- तुला मी चांगला खलाशी करतो. - चल माझ्याबरोबर.'

या वेळेपर्यंत जॉन सिल्व्हरविषयी माझ्या मनात असलेली भीती कमी झाली होती आणि जॉन सिल्व्हर मला आवडू लागला होता.

त्यानं आणलेले सगळे कामगार एकजात कळकट होते. पण जॉनचा ते आदर करत. आमच्या जहाजानं किनारा सोडल्यावर दोन दिवसांनी कॅप्टन स्मॉलेटनंही मान्य केलं,

'जॉन सिल्व्हर हा इमानदार आहे, असं मलाही वाटायला लागलंय. मात्र त्या ॲरोवर अजिबात विश्वास ठेवू नका. दिवसभर रम ढोसत असतो. डुक्करच आहे. --- आणि एक कोडं मला अजूनही उलगडलं नाही. - तो इतकी रम आणतो तरी कुठून ?'

पण ते रहस्य शोधण्याचीही आवश्यकता राहिली नाही. कारण एका रात्री झालेल्या वादळात ॲरो समुद्रात फेकला गेला आणि संपला. त्याला गिळलेल्या माशाचा शोध घेणं, माझ्या ताकदीपलिकडचं होतं.

ॲरो गेला, तरी त्याची उणीव आम्हाला भासली नाही. कारण स्वतः ट्रेलॉनै यांना समुद्रावरच्या प्रवासाचे सगळे बारकावें माहीत होते. शिवाय ॲंडरसन, इस्त्रायल आणि हॅंडस् या स्मॉलेटच्या नोकरांनी ॲरोचं काम केलं.

कॅप्टन स्मॉलेट कडक असला, तरी चतुरच होता. त्याच्यामुळं आमचा पुढचा प्रवास सुकर झाला.

जॉन सिल्व्हर आमच्याशी नेहमी सभ्यपणे वागायचा. पण त्याचंही काहीतरी रहस्य होतं खास. जॉन सिल्व्हरच्या खांद्यावर सदैव एक पोपट होता. तो दिवसभर बडबड करायचा. त्याची बडबड भयंकरच असायची. शिव्या तर इतक्या द्यायचा की ---

सगळा प्रवास जवळजवळ संपवून आम्ही आता बेटाजवळ आलो होतो. मला भूक लागली होती म्हणून मी डेकवर आलो. तिथं नेहमी एक मोठं पिंप असायचं. आणि त्यात सफरचंदं. पण प्रवासात या खाद्याचा सगळ्यांनी फडशा पाडला होता.

सफरचंद शोधण्यासाठी मी त्या पिंपात उडी मारली. हाताला लागलेलं सफरचंद तोंडात कोंबत मी बाहेर यायला लागलो. एवढ्यात जॉन सिल्व्हरचा आवाज माझ्या कानावर आला.

मला काय वाटलं कुणास ठाऊक, मी तसाच पिंपात दडून बसलो.

जॉन सिल्व्हर एकटा नव्हता. त्याच्याबरोबर त्याचे सहकारीही होते. जॉन आला, तो पिंपालाच टेकून बसला.

आता मात्र मी घाबरलो. जॉन दबक्या आवाजात बोलायला लागला,

'गप्प बसा तुम्ही सगळेजण. आणि मी काय म्हणतो, ते लक्ष देऊन ऐका. आपण सगळेजण कॅप्टन फ्लिंटच्या टोळीतले आहोत. उगाच उतावळेपणा कराल, तर आपल्या सर्वांनाच एके दिवशी फासावर जावं लागेल. एकदा खजिना हातात आला

की मगच आपण बंड करायचं. आपण जहाजच ताब्यात घ्यायच.

'पण ट्रेलॉने आणि त्याच्या सहकाऱ्यांच काय ?', कुणीतरी मधेच विचारलं.

जॉन सिल्व्हर दबक्या स्वरात हसला म्हणाला,

'काहीतरी बडबडू नकोस. मेलेली माणसं आपल्याविरुध्द काय करणार आहेत आपल्याला ? ट्रेलॉने आणि त्याच्या सहकाऱ्यांचे मुडदे पाडायचं काम तुमचं. कॅप्टन स्मॉलेटचा खिमा करण्याचं काम माझ्यावर सोपवा.'

भीतीनं माझं बर्फ झालं. पिंपात मी आहे हे खलाशांना कळलं असतं. तर त्यांनी माझे खरंच तुकडे केले असते. पण मी जगावं असा, दैवी संकेतच होता. कारण जॉन सिल्व्हरची खलाशांबरोबर चर्चा चालू असतांनाच एकाएकी जहाजाच्या कावळ्याच्या घरट्यातून (जहाजाची टेहाळणीची जागा) आवाज आला,

'जमीन आली हो ऽ, जमीन आली हो ऽ, आपण बेटाजवळ पोचलो आहोत. हुश्शाऽऽर !'

जॉन व त्याचे सहकारी गेल्याचा आवाज आला. पिंपातून मी हळूच बाहेर आलो.

पण भीतीमुळं माझ्या पायातली ताकदच गेली होती.

***

## ४. खजिन्याच्या बेटावर

आमचं जहाज बेटाजवळ पोचलं, त्यावेळी चंद्र चांगला वर आला होता. चंद्रप्रकाशात बेट लुकलुकत होतं. समुद्रही काहीसा उसळल्यासारखा झाला होता.

आपण कोणत्या संकटात आहोत, याचं मला भान आलं ते आत्ता ! बराच वेळ मी एकाच जागी गोठल्यासारखा उभा होतो.

लटपटत्या पायांनी मी ट्रेलॉने यांच्या केबिनकडे धाव घेतली. धापा टाकत मी कटाची वार्ता त्यांच्या कानावर घातली. केबिनमधे एकच खळबळ माजली.

एकटा कॅप्टन स्मॉलेट मात्र मजेत हसला. त्याच्या हसण्याचा अर्थ ट्रेलॉने यांच्या बरोबर लक्षात आला. ते म्हणाले,

'कॅप्टन, तुम्ही हे असं काही घडेल, याचं भविष्य अगोदरच केलं होतं.---आता तुमचा अनुभवच आम्हाला या कठीण प्रसंगातून तारून नेईल.'

'माझ्यावर एवढा विश्वास दाखवल्याबद्दल धन्यवाद !', कॅप्टन म्हणाला, 'पण तुम्ही काळजी करू नका.'

'प्रसंग अवघड आहे. आपण आता नेमकं काय करायचं ?', डॉक्टरनी मधेच विचारलं.

'जॉन सिल्व्हर आणि त्याच्या साथीदारांनी आपल्याला मारायची योजना आखली आहे. पण ते इतकं सोपं नाही. खजिन्याकडं नेणारा नकाशा आपल्या हातात आहे. त्यामुळं नकाशा किंवा खजिना त्यांच्या हातात जाईतोपर्यंत त्यांना काहीही गडबड करता येणार नाही.'

'कॅप्टन म्हणताहेत ते बरोबर आहे', मी मधेच बोललो, 'कारण ते

नकाशाबद्दलही बोलत होते.'

'उमरावसाहेब, समुद्रावरची दुनिया मी खूप पाहिली आहे. पैसा आणि सोनं या गोष्टी भयावह आहेत. माणसाला सोन्याची चटक लागली की मग त्याचं पशूत रूपांतर होतं. जॉन सिल्व्हरची टोळी अशी आहे.'

'हे मलाही मान्य आहे, पण आता या गुंडांवर मात करण्यासाठी आपण काय करायचं ?', ट्रेलॉनिनी विचारलं.

'त्याचाही उपाय माझ्यावरच सोपवा. आता आपल्या जहाजानं नांगर टाकला, की आपण सिल्व्हरच्या टोळीला बेटावर जाण्याची परवानगी देऊ. आपल्यापैकी कुणीही बोटीतून उतरणार नाही. आपले तीन विश्वासू नोकरही आपल्या बरोबरच राहतील.'

'आणि पुढं काय करायचं ?'

'आपण नांगर उचलायचा आणि माघारी वळायचं.'

'माय गॉड !', डॉक्टर किंचाळले.

'हा एकच उपाय आहे. या भयाण बेटावर अन्नावाचून कुणी जगणंच मुळी अशक्य आहे. पंधरा दिवसात सगळे संपतील. कदाचित एकमेकाला कापूनही खातील. पंधरा दिवसांनी आपण परत येऊ आणि खजिन्याबरोबर सिल्व्हर आणि त्याच्या सहकाऱ्यांची हाडंही बरोबर नेऊ. आठवण म्हणून.'

कॅप्टनची योजना ऐकून मी थरारलोच. आता आम्हाला सगळ्यांना एक काळजी घ्यावी लागणार होती. आमची योजना सिल्व्हरला अजिबात कळता कामा नये.

सिल्व्हर आणि त्याच्या सहकाऱ्यांना कॅप्टननं डेकवर बोलावलं. नांगर कुठं टाकावा, हा मोठा प्रश्न होता. नकाशातील जागेप्रमाणं 'कीडस् अँकरेज' अशी जागा होती. तिथं आम्ही नांगर टाकला.

बेटाच्या पूर्वेला व्हाईट हेड नावाची जागा होती. पश्चिमेला हॉलबोलाईन हेड. त्या दोन्ही मधे खाडीचा प्रवाह घुसलेला होता.

निसर्गतःच ते एक सुरेख बंदर तयार झालं होतं. इतकं सुंदर की वादळ आलं, तरी बेटाला त्याचा उपद्रव पोचू नये.

ती जागा बघून सगळेजण खूष झाले. अगदी जॉन सिल्व्हर सुध्दा. नांगर टाकण्यासाटी जहाजाला जागा मिळाल्यावर कॅप्टन स्मॉलेटनं गंमत केली. डेकवर

त्यानं सर्वांना एकत्र बोलावलं. आणि सिल्व्हरच्या साथीदारांना कॅप्टन म्हणाला,

'तुमच्या कामगिरीवर मी अगदी खूष आहे. स्वतः उमरावसाहेबही खूष आहेत. या प्रवासात तुम्ही सर्वांनीच उत्तम कामगिरी केली. त्याचं बक्षिस म्हणून आता तुम्हाला प्रत्येकाला रम दिली जाईल.'

कामगारांनी खूष होऊन आरडाओरडा केला. जॉन सिल्व्हर ढोंगीपणे म्हणाला,

'थ्री चिअर्स फॉर मि. ट्रेलॉनि ऽ !'

त्याच्या नाटकीपणाची मला अतिशय चीड आली. कॅप्टन स्मॉलेट मात्र अतिशय शांत होता. त्यानं सांगितलं,

'तुम्हाला आता बेटावर जायला हरकत नाही. निसर्गाची शोभा बघून या. दोन-तीन होड्या तुम्हाला पुरतील, याची मला खात्री आहे. पण जहाजावरून तोफ वाजली की तुम्हा सर्वांना ताबडतोब परत यायला पाहिजे. समजलं ?'

जॉन सिल्व्हरनं दोन होड्या पाण्यात सोडल्या आणि त्यात एकूण तेरा लोक बसले. मी, ट्रेलॉनि, डॉक्टर, कॅप्टन आम्ही सगळे बोटीवरच थांबलो. आम्हा चौघांशिवाय हन्टर, जॉयस आणि रेडरूथ हे तिघं जहाजावरच होते. आम्ही जहाजावरच थांबायचं, हे केव्हाच ठरलेलं होतं.

पण काय झालं कुणास ठाऊक- कदाचित देवाची इच्छा असेल म्हणा. मी मूर्खासारखी एका होडीत उडी मारली. माझा मूर्खपणा बघून कॅप्टननं बहुधा कपाळाला हात लावला असावा.

जसा किनारा जवळ आला, तशा काही गोष्टी माझ्या लक्षात येऊ लागल्या. माझ्याकडून प्रचंड गाढवपणा झाला होता. आता जर जॉन सिल्व्हरनं मला पकडून ठेवलं, तर आमच्या योजनेचा बोऱ्या वाजणार होता आणि बोटीवरच्या लोकांना शरण येण्याशिवाय उपाय राहणार नव्हता.

मी स्वतःवरच चिडलो. पण त्या अडचणीतही माझा मेंदू झपाट्यानं काम करू लागला. आमच्या होड्या किनाऱ्याला लागल्याबरोबर मी विजेच्या वेगानं हालचाल केली.

एकदम जमिनीवर उडी मारून मी समोरच्या जंगलाकडं जीव खाऊन धावत सुटलो. माझ्या त्या कृतीमुळं जॉन सिल्व्हर आणि त्याच्या साथीदारांना आश्चर्याचा धक्काच बसला.

'थांब - पळू नको,' म्हणून सगळेजण ओरडायला लागले. पण मी जराही मागं

वळून पाहिलं नाही. अक्षरशः सुसाट पळत सुटलो. समोरच्या झाडीत घुसलो. उतारावरून घसरत खाली गेलो आणि धापा टाकत एका मोठ्या झाडाआड दडलो.

पण मी किती वेडा होतो, ते लवकरच माझ्या लक्षात आलं. कारण माझ्या मागावर येणाऱ्या जॉन सिल्व्हरचा बटबटीत आवाज माझ्या कानावर आलाच.

जीव मुठीत धरून मी उतारावरच्या झाडाआड दडलो होतो. खलाशांची खजिन्याबद्दल चाललेली चर्चा माझ्या कानावर येत होती. जॉन सिल्व्हर मला दिसतही होता.

त्यातला एक खलाशी जॉनला विरोध करत होता. जॉनचा खुनशीपणा त्याला पटत नव्हता. शेवटी जॉन सिल्व्हरनं मोठं हास्य केलं. गदगदा हसून तो म्हणाला,

'ठीक आहे. तू जर आमच्या कटात सामील होणार नसलास, तर तुला आमच्या शत्रूच्या बाजूनं झुंजण्याची संधीही मी देणार नाही.'

एवढं बोलून जॉन सिल्व्हर थांबला नाही. डोळ्याचं पातं लवतं न लवतं तोच त्यानं कमरेचा सुरा उपसून त्या खलाशाच्या पोटात खुपसला.

एक भयानक किंकाळी फोडून खलाशी खाली कोसळला आणि आचके देत मेला. ते दृश्य बघून मी थरथर कापायला लागलो. जॉन सिल्व्हरनं मलाही असंच मारलं तर ?

जीव मुठीत धरून मी विरूध्द दिशेला धावायला सुरवात केली. माझ्या पायात बळ कोठून आलं होतं कुणास ठाऊक ? मी किती वेळ धावत होतो, ते सुध्दा मला आठवत नाही. शेवटी एका टेकडीवर मी येऊन पोचलो, त्यावेळी माझे पाय लटपटले होते. धापा टाकत मी एका दगडावर बसलो.

अचानक माझ्या लक्षात आलं. फ्लिटच्या नकाशात पाहिलेली ती जागा होती. संशयच नाही. नकाशात दाखवलेली 'स्पाय ग्लास हिल'नावाची जागा ती हीच.

एक सुस्कारा टाकून मी मागं पाहिलं आणि भीतीनं माझ्या काळजाचा ठोकाच चुकला.

एक अक्राळ-विक्राळ रानटी माणूस माझ्यामागं उभा होता. त्याची दाढी आणि डोक्यावरचे केस कसेही अस्ताव्यस्त वाढले होते.

आता पळण्याचं त्राणही माझ्या अंगात नव्हतं. पण माझ्या नजरेनं एक गोष्ट अचूक टिपली. एवढा भयंकर दिसणारा मनुष्य, पण त्याच्या डोळ्यात कारुण्य आणि लाचारीचा भाव होता. माझी काही प्रतिक्रिया होण्यापूर्वीच त्या माणसानं

माझ्यासमोर गुडघे टेकले आणि अत्यंत काकुळतीनं तो म्हणाला,

'तुझ्याजवळ काही आहे का ? मला खाण्यासाठी ?'

मी सुटकेचा निश्वास टाकला. निदान हा माणूस आपल्याला अपाय तरी करणार नाही. ठीक आहे तर !

'तुझ्याजवळकाही खायला आहे का ?' त्यानं पुन्हा विचारलं, 'या गरीब बिचाऱ्या बेन गनसाठी ?'

तो माणसासारखाच वागतोय हे पाहून मला धीर आला. माझी सगळी हकीकत सांगितल्यावर बेन गननं आनंदानं उडीच मारली. तो म्हणाला,

'तू काळजी करू नको जिम. तू आणि तुझ्या मित्रांनी मला मदत केली, तर मी तुम्हाला मदत केल्याशिवाय राहणार नाही. माझ्याकडंही एक होडी आहे. समुद्रकिनाऱ्यावर जो उंच कडा आहे, त्या कड्याच्या बगलेत मी ती होडी लपवलीय्. तुम्ही मला मदत केलीत, तर मी तुम्हाला पैसे देईन.--- पण एक गोष्ट लक्षात ठेव. माझ्याबद्दल जॉन सिल्व्हरजवळ एकही अक्षर बोलू नकोस. समजलं ?'

मी नुसती मान डोलावली.

थोड्या वेळानं बेन गननं त्याची सगळी हकीकत मला ऐकवली. तो फ्लिंटच्या जहाजावर होता. फ्लिंटनं ज्यावेळी या बेटावर संपत्ति लपवली, त्यावेळी बेन जहाजावर होता. फ्लिंटनं आपला खजिना बेटावर लपवला आणि परत येतांना त्याच्याबरोबर गेलेल्या सातही खलाशांना गोळ्या घालून ठार मारलं.

पुढं फ्लिंट मेल्यावर बेन गननं दुसऱ्या जहाजावर नोकरी धरली. फ्लिंटनं या बेटावर खजिना लपवला आहे, हे त्याला माहीत होतं. नवीन मालकाला त्यानं या खजिन्याबद्दल सांगितलं.

पैशाच्या लोभानं तोही या बेटावर आला. पण खजिन्याचा छदामही त्यांना मिळाला नाही. चिडलेल्या कॅप्टननं शिक्षा म्हणून बेनला त्या बेटावरंच ठेवलं.

एक उसासा टाकून बेन म्हणाला,

'जिम, गेली तीन वर्ष मी बेटावर एकटा आहे. भुतासारखा. प्रत्येक दिवस मी कसा काढला असेल बघ. पण तू अजून लहान आहेस. मी कोणत्या दिव्यातून गेलो, हे तुला नाही कळायचं. तू एक गोष्ट मात्र लक्षात ठेव ऽ--- '

बेनचं वाक्य पुरं होण्यापूर्वीच एकदम तोफांचा आवाज ऐकू येऊ लागला. त्याबरोबर आरोळ्यांचे आवाज. बंदुकाही धडाडू लागल्या. पण हा आवाज

जहाजाच्या बाजूनं नव्हे, तर बेटावरूनच येत होता.

'युध्दाला सुरवात झाली आहे', मी किंचाळलो.

'युध्द कुठं चाललं आहे, ते मी तुला दाखवतो चल', बेन मला म्हणाला. माझ्या मनात काय चाललं आहे, हे त्यानं अचूक ओळखलं होतं.

'पलिकडच्या बाजूलाच मेढेकोट आहे. तिथं तुझे सहकारी पोचलेले दिसतात. चल, आपण पाहू या.'

बेनचा अंदाज अचूक होता. ट्रेलॉने यांनी बरोबर घेतलेला ध्वज मेढेकोटाच्या मध्यावर असलेल्या घरावर फडकत होता. आम्ही डगर चढून वर आल्यावर आम्हाला तो स्पष्ट दिसला. मेढेकोट म्हणजे काय ते तुम्हाला सांगतो. टेकडीवर असलेलं लाकडी घर आणि त्याभोवतीचं लाकडी कुंपण म्हणजे मेढेकोट.

'तू मेढेकोटाकडं पळ. मी काय सांगितलंय ते विसरू नकोस- आणि आपल्या भेटीची जागाही आता हीच राहील- उद्या भेटू या ऽ-- '

आणि बघता बघता बेन दिसेनासा झाला. मला विचार करायला वेळच नव्हता. मेढेकोटाकडं मी धावत सुटलो. ट्रेलॉने यांच्याकडं धावतांना एकच भीती मनात होती. जॉन सिल्व्हरनं झाडलेली एखादी गोळी आपल्याला लागली तर ?

***

## ५. मृत्यूशी लपंडाव

माझ्या चुकीमुळं माझ्या मित्रांना जहाजावरून बेटावर यावं लागलं होतं. मेढेकोटाच्या मागच्या बाजूनं मी कुंपणावरून आत गेलो आणि घरात घुसलो.

मला बघून सारेजण थक्कच झाले. डॉक्टरनी तर गुडघे टेकून देवाचे आभारच मानले. माझी सगळी हकीकत मी त्यांना सांगितली आणि बेन गनच्या भेटीची चित्तर कहाणीही त्यांना ऐकवली. मग म्हणालो,

'माझ्यामुळं तुम्हाला या संकटात यावं लागलं.'

वस्तुस्थिती तशी नव्हती. सगळे खलाशी जॉन सिल्व्हरबरोबर बेटावर आले नव्हते. काहीजण जहाजावरच लपून बसले होते. साहजिकच कॅप्टन स्मॉलेटच्या ते लक्षात आलं.

त्यानं झपाट्यानं हालचाल करुन सगळ्यांना कैद केलं. खलाशांपैकी एक टॉम ग्रे हा मात्र कॅप्टनच्या बाजूला आला.

मी त्यावेळी बेटावर असल्यामुळं मला ही वार्ता नव्हती. त्यावेळी समुद्रावरचा वाराही फिरला होता. त्यामुळं जहाज माघारी वळवणं अशक्यच होतं.

वारा अनुकूल होईतोपर्यंत थांबणं भागच होतं. म्हणूनच सगळ्यांनी बेटावर उतरून माझा आणि खजिन्याचा शोध घेण्याचं ठरवलं. खलाशांना एका खोलीत कैद करून जहाजावरच्या एकमेव होडीतून माझ्या मित्रांनी पाच खेपात बेटांपर्यंतचा प्रवास खाडीतून केला होता.

पहिल्या चार खेपा सुखरूप झाल्या. त्या चार खेपात अन्न-धान्य, दारुगोळा हा ट्रेलॉने आणि कॅप्टननी मिळून मेढेकोटात आणला होता. पण पाचव्या खेपेला

घोटाळा झाला.

जहाजावरच्या खोलीत बंद केलेल्या खलाशांनी स्वतःची सुटका करून घेतली आणि तोफांचा ताबा मिळवला. तोफांच्या अचूक माऱ्यामुळं होडीच्या चिंधड्या झाल्या. ट्रेलॉने यांचे दोन नोकर मारले गेले. माझे मित्र मात्र त्यातून कसे बसे वाचले.

कॅप्टन स्मॉलेटनं सर्वांना सांगितल,

'काही का असेना, जिम सुखरूप परत आला, हे ठीक झालं. आता एक गोष्ट विसरता कामा नये. पुन्हा आपण सात जणच आहोत. आपल्या सर्वांना एकदिलानं झुंजावं लागणार आहे. शिवाय जहाजाकडं जायचं म्हटलं, तर आपल्याकडं होडी नाही. दोन्ही होड्या जॉन सिल्व्हरच्या ताब्यात आहेत. त्यामुळं शत्रूची ताकद आज तरी जास्त आहे. आपल्याला आठवडाभर पुरेल एवढंच अन्न आपल्याजवळ आहे. तेव्हा प्रत्येकानं सावधानतेनं आणि जबाबदारीनं वागलं पाहिजे'.

सर्वांनी संमतिदर्शक मान डोलावली. ती रात्र मेढेकोटात तणावात गेली. रात्रभर आलटून-पालटून सगळेजण पहारा देत होते. जॉन सिल्व्हरचा हल्ला आला तर ?

पण रात्र तशीच गेली. काहीही घडलं नाही.

झुंजुमुंजू झालं. बेटावर अजून सगळीकडं धुकं होतं. विशेष काही घडलं नसलं, तरी पहारा हा चालूच होता.

अचानक धुक्यातून पुढं येतांना पांढरा झेंडा मी पाहिला. त्यामागून येणारी व्यक्ती मी धुक्यातूनही ओळखली.

'जॉन सिल्व्हर !' मी ओरडलो.

क्षणार्धात सगळ्यांच्या बंदुका उचलल्या गेल्या. पण कॅप्टन स्मॉलेट म्हणाला,

'नोऽ ! कुणीही गोळी झाडू नका ! तो पांढरा झेंडा घेऊन येतो आहे. त्याला काही बोलायचं आहे. तेव्हा कुणीही गोळी झाडू नका. फक्त सावध रहा. मीच पुढं जाऊन त्याचं स्वागत करतो'.

लांबूनच जॉन सिल्व्हर ओरडला,

'मला तुमच्याशी काही बोलायचं आहे.'

कॅप्टनच्या चेहऱ्यावरची सुरकुतीही हलली नाही. अगदी शांतपणे तो खोलीबाहेर पडला आणि जॉन सिल्व्हरला सामोरा गेला.

'जॉन सिल्व्हर, खाली बैस. आणि तुला जे काही सांगायचं आहे, ते थोडक्यात सांग.'

जॉननं मातीत बसकण उडी मारली आणि गदगदा हसत म्हणाला,

'तुम्हा लोकांची मला दया आली म्हणून मी तुम्हाला भेटायला आलो आहे. माझे मित्र खजिना तर मिळवणार आहेतच पण त्यांना तुमच्या रक्ताचीही तहान आहेच. कशाला प्राण संकटात घातलाय ? मुकाट्यानं खजिन्याचा नकाशा मला द्या. तसं केलंत तर मी तुम्हाला मारणार नाही. आमच्याच जहाजावरून तुम्हाला सुखरूप परत सोडेन. आता बोला !'

कॅप्टन स्मॉलेटनं जॉनला थंड डोळ्यानी पाहिलं आणि त्याहून थंड स्वरात तो म्हणाला,

'आता मी काय म्हणतो, ते ऐक. हत्यारं टाकून तू आणि तुझे गुंड सहकारी मला शरण या. लंडनला परत गेल्यावर तुम्हाला फासावर जावं लागणार नाही; एवढंच वचन मी देतो. माझ्या मदतीशिवाय तुम्हाला जहाज हलवता येणं शक्य नाही. कळलं ? विचार करून तुझा निर्णय मला उद्या सांग आणि आता चालायला लाग !'

आम्हाला शिव्यांची लाखोली वाहात जॉन सिल्व्हर धुक्यात दिसेनासा झाला.

आता त्याच्या टोळीचा हल्ला कोणत्याही क्षणी येण्याची शक्यता होती. कॅप्टन स्मॉलेटनं पुन्हा एकदा सगळी सूत्रं शांतपणे आपल्या हातात घेतली.

'जॉन सिल्व्हरचा हल्ला येणार हे नक्की आणि माझा तर अंदाज आहे की तो सगळ्या बाजूंनी येणार. म्हणून मी सांगतो तशी बचावाची फळी आपण उभी करू या. आपल्या सगळ्यात उत्तम नेमबाज म्हणजे उमरावसाहेब. मेढेकोटाच्या दक्षिण बाजूला उतार आहे. त्या बाजूनं सगळ्यात जोरदार हल्ला येणार. तेव्हा दक्षिण बाजूची जबाबदारी उमरावसाहेबांची'.

'मी तयार आहे', हातातलं पिस्तुल सरसावत ट्रेलॉने म्हणाले.

'डॉ. लिव्हसे उत्तरेची बाजू सांभाळतील. त्यांना हंटर मदत करेल. या दोनच दिशांनी प्रमुख हल्ला होणार यात शंकाच नाही'.

कॅप्टन स्मॉलेटनं क्षणभर सर्वांकडं रोखून बघत म्हटलं,

'आणि मी जिथं जरूर लागेल, तिथं असेनच.'

'पण मी काय करायचं ?', कॅप्टनचा हात पकडत मी विचारलं.

'अरे होऽ जिम, मी तुला विसरलोच होतो. आपण असं करू या - तुझ्या जोडीला मी टॉम ग्रे याला देतो. तुम्ही दोघांनी दारुगोळा सांभाळायचा आणि लागेल तसा आम्हाला पुरवायचा.'

युध्दासाठी आम्ही जय्यत तयारी केली आणि आम्हाला फार वेळवाट पाहावी लागली नाही. तासा-सव्वा तासातच जॉन सिल्व्हर आणि त्याच्या सहकाऱ्यांचा गलका आमच्या कानावर आला.

कॅप्टनचा अंदाज चुकला नाही. मेढेकोटाच्या सगळ्या बाजूनी खलाशांनी हल्ला चढवला होता. बंडखोर आमच्या टप्प्यात येईतोपर्यंत आम्ही काहीच गडबड केली नाही.

सगळेजण बंदुका आणि पिस्तुलं रोखून जय्यत तयार होते. बंडखोर टप्प्यात आल्याबरोबर कॅप्टन स्मॉलेट ओरडला - 'फायर !'

एकदम बंदुका धडाडायला लागल्या. सगळी टेकडी धुरानं भरून गेली. किंकाळ्या उठल्या. जणू सगळं बेट हादरून गेलं.

ट्रेलॉनि यांनी अचूक मारा करून दोन बंडखोरांना लोळवलं.

कलकलाट करत पक्षी हवेत उडाले. जखमी माणसांच्या किंकाळ्या आणि विव्हळणं ऐकू येत होतं. कॅप्टन स्मॉलेटनं आणखी एकाला अचूक टिपलं.

या धुमश्चक्रीत काही खलाशी आमच्या खोलीपर्यंत आले होते. काहीजण आत घुसले. हातघाईची लढाई सुरू झाली. धुमश्चक्रीत बिचाऱ्या हंटरचा बळी गेला. पण टॉम ग्रे यानं हातातल्या रूंद सुऱ्यानं अॅण्डरसनचं पोट फाडून कोथळाच बाहेर काढला.

ट्रेलॉनि यांच्या अचूक माऱ्यापुढं बंडखोरांची दाणादाण उडाली. जॉन सिल्व्हर आणि त्याच्या उरलेल्या मित्रांनी पळ काढला.

आमचंही थोडं नुकसान झालं होतं. हंटर केव्हाच मृत्यू पावला होता. कॅप्टन स्मॉलेटच्या उजव्या हाताला मोठी जखम झाली होती.

आणि माझ्या पायावर सुऱ्याचा घाव बसल्यामुळं रक्त निघालं होतं. नशीब एवढंच की जखम खोल नव्हती.

एवढ्या घनघोर युध्दानंतर अनेकांना थकवा आला. डॉक्टरनी जखमी वीरांना मलमपट्टी केली. मला तर झोपच आली.

मी जागा झालो त्यावेळी डॉक्टर, उमराव आणि कॅप्टन हलक्या आवाजात काहीतरी कुजबुजत होते. थोड्या वेळानं डॉक्टर उठले. कमरेला त्यांनी पिस्तुल खोचलं. थोडा दारुगोळा बरोबर घेतला. आश्चर्य म्हणजे खजिन्याचा नकाशा गुंडाळी करून त्यांनी बरोबर घेतला आणि बघता बघता ते उत्तरेच्या बाजूला गर्द झाडीत

दिसेनासे झाले.

माझं जडावलेलं डोकं मी हलवलं. एकदम माझ्या लक्षात आलं. डॉक्टर बेन गनकडं गेले असणार. शंकाच नाही.

दहा - पंधरा मिनिटं झाली असतील नसतील, तोच सोसाट्याचा वारा वाहायला लागला. आभाळ भरून आलं. समुद्राचं ताण्डव सुरू झालं. भीषण वादळाची ती सुरवात होती.

आता जॉन सिल्व्हरचा हल्ला येणं शक्य नव्हतं. वादळ काही फार वेळ थांबलं नाही. तासाभरात आभाळ पुन्हा एकदा स्वच्छ झालं.

माझ्या डोक्यात अजूनही बेन गनचाच विषय होता. समुद्रकिनाऱ्याजवळच्या कड्याखाली त्यानं होडी लपवली आहे. ती आपल्याला मिळेल का ?

होडीच्या शोधासाठी बाहेर पडण्याचा मी निर्णय घेतला. कुणाचं लक्ष नाही, असं पाहून दोन पिस्तुलं मी कोटाच्या खिशात दडवली. थोडा दारुगोळाही बरोबर घेतला. आणि मेढेकोटाच्या कडेनं फिरण्याचं निमित्त करून मी जंगलात सुसाट पळत सुटलो.

समुद्रकिनाऱ्यापर्यंत पोचायला मला फारसा वेळ लागला नाही. झाडीतून मी पाहिलं. जॉन सिल्व्हर आणि त्याच्या दोन खलाशी मित्रांचं जहाजातलं सामान बाहेर काढण्याचं काम चालू होतं. जॉन सिल्व्हरच्या खेपा थांबल्यावर मी संधी घ्यायचं ठरवलं.

समुद्राजवळच्या कड्याखाली मी पोचलो. बेन गन खोटं बोलला नव्हता. त्याची छोटी होडी वल्ह्यासकट तिथं होती.

जॉन सिल्व्हरचा मला इतका राग आला होता की कोणताही विचार न करता ती अगदी लहान होडी मी पाण्यात ढकलली आणि वल्ह मारत जहाजाकडं निघालो. माझ्या मनात एकच विचार होता. नांगराला जोडलेले दोर कापून टाकायचे. त्यामुळं जहाज समुद्रात भरकटत जाईल आणि जॉन सिल्व्हरचा वडा होईल.

माझ्या मनात इतका साधा विवेक नव्हता की त्यामुळं आम्हीही बेटावरच अडकून पडलो असतो. माझा चिडका बिब्बा झाला होता.

धुक्यातून होडी वल्हवत मी जहाजाजवळ पोचलो. धुक्यातलं जहाज भयंकर दिसत होतं. माझ्या मनावर भयानक दडपण आलं.

जहाजावर आरडाओरडा चालला होता. जॉनच्या खलाशांमधे मारामाऱ्या

चालल्या होत्या. मी बेटाकडं नजर टाकली. शेकोटी पेटवून जॉनचे सहकारी त्याभोवती नाचत होते.

माझं डोक आता भयंकरच फिरलं. पाण्याचा फारसा आवाज होऊ नये, म्हणून हलक्या हातानं होडी वल्हवत मी जहाजाजवळ गेलो. नंतर माझं मलाच हसू आलं. कारण जहाजावर इतका गदारोळ चालला होता की माझ्या होडीचा आवाज खलाशांपर्यंत पोचणं शक्यच नव्हतं.

नांगराच्या दोरापर्यंत मी अलगद पोचलो, कमरेचा सुरा उपसला आणि ताकद एकवटून मी दोरावर घासायला सुरवात केली. फार तर दीड- दोन मिनिटंच लागली असावीत. दोर तटकन तुटला. त्याला ताण एवढा होता की दोर तुटल्यावर मी समुद्रातच फेकला जाणार होतो. मी स्वतःला कसबसं सावरलं.

घाईघाईनं मी होडी मागं वळवली. आणि किनाऱ्याकडं वल्हवायला सुरवात केली. आनंदानं मी बेहोष झालो होतो. जॉन सिल्व्हर आणि त्याच्या बंडखोर मित्रांची आपण कशी फजिती केली या विचारानं मला हर्ष झाला होता.

एवढ्यात घोटाळा झाला. समुद्र अचानक उसळला. आभाळ गडगडायला लागलं. माझी होडी उसळत्या लाटांवर फेकली जाऊ लागली.

माझ्या आनंदाची जागा भीतीनं घेतली. होडीत पाणी भरायला लागलं. छोट्या हातांनी मी वेड्यासारखा ते बाहेर काढण्याचा प्रयत्न करायला लागलो. माझे प्रयत्न व्यर्थ आहेत हे मला माहीत होतं.

एवढ्यात उसळत्या लाटेनं मला असा फटका दिला की वेदनेनं माझ्या जीव कळवळला. पावसाचं आणि लाटांचं थैमान जोरातच सुरू झालं. लागोपाठ दुसऱ्या लाटेनं मला तडाखा दिला. इतक्या जोरात की मला भोवळच आली. मग तिसरी लाट, चवथी, पाचवी --- आणि माझी शुध्द हरपली. ---

--- किती तासांनी मी डोळे उघडले कुणास ठाऊक, माझ्या दृष्टीला पडलं ते स्वच्छ निळं आभाळ.- म्हणजे मी जिवंत होतो तर !

मी उठून बसलो. मंद वाऱ्यावर माझी होडी अगदी शांतपणे डुलत होती. आणि आश्चर्य म्हणजे नांगराचा दोर कापलेलं जहाज समुद्रात भरकटत जाण्याऐवजी लाटांच्या तडाख्यानं आणखीनच किनाऱ्याकडं गेलं होतं.

पण हे असं कसं झालं ? म्हणजे ? जहाजावर कोणीच नाही काय ? नक्कीच ! म्हणूनच ही गडबड झाली असणार !

वाऽ !आता सोन्यासारखी संधी चालून आली आहे. आपणच जहाजाचा ताबा घ्यावा हे बरं !

होडी मी पुन्हा एकदा जहाजाकडं वळवली. मी कापलेला नांगराचा दोर जहाजावरून खाली लोंबत होता. उडी मारून मी तो पकडला आणि हात कचत असतांनाही, माकडाप्रमाणं मी सरसर वर गेलो.

जहाजात पाऊल टाकणार तोच समोरच्या दृश्यानं माझं रक्तच गोठलं. ओ' ब्रायन नावाचा खलाशी तोंड आऽ वासून उताणा पडला होता. त्याच्या छातीत सुरा खुपसलेला होता. त्याच्या बाजूलाच जखमी झालेला इस्त्रायल हॅण्डस् पडला होता.

'मला कुणीतरी रम द्या', म्हणून काकुळतीच्या स्वरात तो ओरडत होता.

मी उडी मारून डेकवर गेलो. इस्त्रायलनं मला ओळखलं,

'जिम, मला रम दे. तरच मी जगेन. नाहीतर संपलोच. मला थोडी रम दे.'

जवळच पडलेली रमची बाटली मी इस्त्रायलला दिली. आधाशासारखी त्यानं ती घशाखाली ढोसली. थोडी तरतरी आल्यावर तो म्हणाला,

'कसंही कर आणि या जहाजाचा ताबा घे.'

'घेईन', मी म्हणालो, 'पण एका अटीवर. उत्तरेच्या बाजूला लहान खाडीकडं मी जहाज घेऊन जाईन'.

'काहीही कर - पण नांगर नसलेलं हे जहाज समुद्रावर वाट्टेल तिकडं जायला नको'.

ताबडतोब मी सुकाणू हाती घेतलं. आणि सुखरूपतेसाठी जहाज उत्तरेच्या बाजूला वळवलं. जहाज त्या लहान खाडीत घुसवून किनाऱ्याकडं न्यायला मला फारसे परिश्रम पडले नाहीत. माझ्या त्या प्रयत्नात मी इतका गर्क झालो होतो की माझ्यामागं येणाऱ्या पावलांचा आवाज अगदी जवळ येईतोपर्यंत माझ्या कानात शिरलाच नाही.

पावलांचा आवाज अगदी मागं वाजल्यावर मी वळून पाहिलं आणि किंचाळलोच.

इस्त्रायल माझ्यापासून अवघ्या एका फुटावर उभा होता. त्याच्या हातातलं सुऱ्याचं पातं लखलखलं.

संकट आलं की माणसाला कशा युक्त्या सुचतात !

शेजारीच असलेल्या शिडीवरून मी सरसर वर चढत गेलो.

रम पिल्यामुळं इस्त्रायलला तरतरी आली होती आणि जखमी अवस्थेतही तो माझ्यावर हल्ला करायला तयार झाला होता.

म्हणजे मगाशी तो लाचारीनं बोलला ते सगळं खोटंच तर !

माझ्यापाठोपाठ इस्त्रायलही शिडीवर चढून वर येऊ लागला. अचानक माझ्या लक्षात आलं. माझ्याजवळ दोन पिस्तुलं होती. सर्रकन् मी कोटाच्या खिशातून पिस्तुल काढलं आणि ओरडलो,

'शिडीवरून खाली उतर ! नाहीतर गोळी झाडीन.'

इस्त्रायलनं झिंगलेल्या डोळ्यांनी माझ्याकडं पाहिलं आणि सुरा उगारून तो वर येऊ लागला. क्षणार्धात मी पिस्तुल झाडलं. गोळीनं अचूक वेध केला आणि भयाण किंकाळी फोडून इस्त्रायल खाली कोसळला.

कपाळावर आलेला घाम मी पुसला आणि खाली उतरलो. जहाज अगदी बरोबर जागी आलं होतं. दोन्ही बाजूला उंच कडे ! मधे खाडी !जहाज सुरक्षित होतं.

आता ही गोष्ट कॅप्टन आणि उमरावांच्या कानावर घालायला हवी. बेटावरून मी सुसाट धावत सुटलो.

मेढेकोट शोधायला फारशी अडचण पडली नाही. बाहेर शेकोटी जळत होती. आनंदानं मी खोलीचं दार उघडून आत शिरलो ---

--- समोर उभा होता जॉन सिल्व्हर ! त्याच्या खांद्यावरचा पोपट ओरडला,

'आला ! चोर आला ! पकडा त्याला !'

बधिरल्या मनानं मी त्या दोघांकडं आलटून पालटून बघत राहिलो !

***

## ६. बेन गनचं रहस्य

जॉन सिल्व्हरला बघून मी हादरलोच. पण मला बघून जॉन सिल्व्हरची तीच अवस्था झाली असावी. खलाशी तर उडालेच. मी अजून जिवंत आहे, यावर त्यांचा विश्वास बसत नसावा.

मग भानावर आलेला जॉन सिल्व्हर गदगदा हसायला लागला. हसून हसून डोळ्यात आलेलं पाणी त्यानं निपटून टाकलं. मला उद्देशून जॉन म्हणाला,

'बरं झालं जिम तू आलास. आता तुझ्या मित्रांकडं परत जाण्याचा तुझा विचार तू अजिबात सोडून दे. त्यांना तुझ्याबद्दल प्रेम नाही. आता तू आमच्याच टोळीत राहणार'.

तशा अवघड परिस्थितीतही मी सुटकेचा निःश्वास टाकला. कारण सिल्व्हरनं मेढेकोट जिंकलेला पाहून माझा थरकाप झाला होता. वाटलं होतं - ट्रेलॉनेसकट सर्वांना जॉन सिल्व्हरनं ठार मारलं.

'म्हणजे ? उमराव आणि त्यांचे सहकारी अजून जिवंत आहेत ?', मी नकळत विचारलं.

'अर्थातच !', सिल्व्हर म्हणाला, 'पण सगळ्यांना मी पराभूत केलं आहे. कालच तुझा तो डॉक्टर पांढरा झेंडा घेऊन माझ्या पायावर शरण आला होता'.

सगळे खलाशी खोऽ खोऽ हसले.

जॉन सिल्व्हर पुढं सांगायला लागला,

'जहाजावरचं सगळं साहित्य तुझ्या मित्रांनी पळवलं होतं. पण काल मात्र त्यातला बराचसा भाग त्यांना मला द्यावा लागला. रम, ब्रँडी, खाण्याचे पदार्थ,

दारुगोळा, सर्पण आणि बरंच काही !'

'मग ?'

'मग काय ? मला दया आली. मी त्यांचे प्राण वाचवले. दुसरं काय करणार ? पण एक मोठा घोटाळा झालाय्.'

'कोणता ?'

'--- आपलं जहाज कुठं तरी हरवलंय्. आमचे काही खलाशीही जखमी झालेत. म्हणूनच मी तुझ्या मित्रांना अजून जिवंत ठेवलंय्. जॉर्जला ताप आलाय्. मॉर्गनचं डोकं फुटलंय्. तुझा तो डॉक्टर औषध द्यायला आला होता.'

थोडा वेळ शांततेत गेला. मग माझं बखोटं पकडत जॉन सिल्व्हर म्हणाला,

'पोरा, तुझं पळणं आता पुष्कळ झालं. तुला निर्णय करावाच लागेल. आमच्या टोळीत सामील हो, नाहीतर माझे हे मित्र तुला ऽ ऽ---.'

असं म्हणून सिल्व्हरनं गळ्यावरून हात फिरवत 'च्च्क ' करून आवाज काढला.

याखेपेला मात्र मी घाबरलो नाही. उलट जॉन सिल्व्हरवर ओरडलो,

'मारा तर मग मला. काय मिळणार आहे मला मारून ? तुम्ही लढाई जिंकली नाहीत. तुमची लढाई तुम्ही केव्हाच हरलेली आहात. जहाजाच्या नांगराचा दोर मी कापला. होय - मीच ! मला आत्ता तुम्ही माराल. पण तुम्हीही इथंच मरणार आहात, हे लक्षात ठेवा.'

मी असं काही बोलेन, याची कुणालाच कल्पना नसावी. एकदम शांतता पसरली.

मग डोक्याला बांधलेली पट्टी सावरत मॉर्गन उठला आणि खेकसला,

'चूप बैस ! फार बडबडलास. आता एक शब्द बोललास तरी तुला छाटून टाकू !'

मॉर्गनचे इतर मित्रही उठले.

जॉन सिल्व्हरनं मला त्याच्यामागं पटकन् दडवलं आणि तो ओरडला,

'मी अजूनही तुमचा म्होरक्या आहे, हे विसरूनका. या पोराच्या नखालाही कुणी धक्का लावाल, तर खबरदार !'

एक क्षणभर खलाशी गोंधळले. पण आता माघार घेण्याची त्यांची तयारी नव्हती. जॉर्ज मेरी नावाचा खलाशी ओरडला,

'असशील तू आमचा म्होरक्या ! पण तू आमच्यासाठी काय केलं आहेस ? जहाज नाही, अजून खजिनाही हाती आलेला नाही. आपले नियम तुला माहीत आहेत. आमच्यात तुझं स्थान काय, याची चर्चा करण्याची वेळ आता आली आहे.'

'जरूर चर्चा करा', सिल्व्हर म्हणाला.

सिल्व्हरचे पाच खलाशी दाराजवळ जाऊन कुजबूज करू लागले.

'मूर्ख आहेत सगळे. त्यांना दणका दिल्याशिवाय मी राहणार नाही. जिम, तू काळजी करू नकोस. मी तुझे प्राण वाचवीन. पण तूही माझे प्राण वाचवले पाहिजेस. कबूल ?'

मी मान होकारार्थी हलवली.

एवढ्यात सगळे खलाशी आत आले. मॉर्गननं कागदाचा एक कपटा जॉन सिल्व्हरच्या हातात ठेवला.

जॉननं शांतपणे तो कागद वाचला.

'ठीक आहे. म्होरक्या म्हणून आता मी तुम्हाला नको आहे तर ! माझी काहीच हरकत नाही. पण आपला नवीन म्होरक्या कोण आहे, ते तरी मला कळू दे.'

'मी !', मॉर्गन ओरडला.

'फारच छान !', जॉन सिल्व्हर म्हणाला, 'पण मॉर्गन काही महत्वाच्या गोष्टी तू तुझ्या मित्रांना सांगितल्या असशीलच. खजिना मिळवण्याच्या योजनेला तुझा विरोध होता, हे तू आपल्या मित्रांना सांगितलं असशीलच. शिवाय डॉक्टरनी तुझ्या डोळ्यांना मलमपट्टी केली, ती माझ्या सांगण्यावरूनच, हे सुध्दा सांगायला तू विसरला नसणारच. आणि हेही सांगितलं असशीलच की या मुलामुळंच आपली फाशी चुकू शकेल. डॉक्टरकडून मला खजिन्याचा नकाशा मिळाला आहे हे तू मित्रांना सांगितलंस, तर त्यांना आनंदच वाटेल.'

जॉन सिल्व्हरचं बोलणं ऐकतांना मॉर्गन पांढराफटक पडला. गुडघे टेकत म्हणाला,

'माझं चुकलं. तूच आमचा म्होरक्या. खजिन्याची वाट तूच आम्हाला दाखव.'

इतर खलाशीही आता घाबरले होते. पण जॉन सिल्व्हरनं सगळ्यांना माफ केलं. इतक्यात कुणीतरी उंच स्वरात ओरडलं,

'डॉ. लिव्हसे आले !'

मी खिडकीतून पाहिलं. डॉ. लिव्हसे लाकडी कोट ओलांडून खरोखरच आत

येत होते.

मला पाहून त्यांना आता पुन्हा एकदा धक्का बसला. स्वतःला सावरत त्यांनी जॉन सिल्व्हरला विचारलं,

'आता जखमी खलाशांची तब्येत कशी आहे ?'

'धन्यवाद डॉक्टरसाहेब, ' असं म्हणत जॉन सिल्व्हर डॉक्टरना घेऊन खलाशांकडं गेला.

डॉक्टरनी अगदी थंड स्वरात म्हटलं,

'जॉन, तुझा काहीतरी गैरसमज झाला आहे. तुझ्या आजारी आणि जखमी खलाशांना बरं करतोय् ते मला चार पैसे मिळावेत, म्हणून नव्हे. तुला तुझ्या मित्रांसहित मला जिवंत ठेवायचंय. कारण लंडनला परत गेल्यावर तुम्हा सर्वांना फासावर जावं लागणार आहे.'

जॉन सिल्व्हरचा चेहरा वेडावाकडा झाला. तोंडातल्या तोंडात जॉन धमकीवजा गुरगुरला. तो काय म्हणत होता, ते त्याचं त्यालाच माहीत !

डॉक्टरनी आजारी बंडखोरांना उपचार केले. बाहेर आल्यावर त्यांनी जॉनला शांत स्वरात सांगितलं,

'आता मला या जिमबरोबर बोलायचं आहे.'

जॉननं खांदे उडवले. थोड्याशा नाराजीनंच तो म्हणाला,

'ठीक आहे. आमच्यावर तुमचे नाही म्हटलं तरी उपकार आहेत ऽऽ —'.

डॉक्टर माझ्याजवळ आले आणि हसत म्हणाले,

'अच्छा - तर तू अजून जिवंत आहेस म्हणायचा. जिम, तू केलेल्या ऽऽ—'.

डॉक्टरांचं बोलणं पुरं होण्यापूर्वीच मी हलक्या आवाजात म्हटलं,

'डॉक्टर, मी काय म्हणतो ते तरी ऐकून घ्या.'

मी सांगितलेली कहाणी ऐकून डॉक्टरांचे डोळेच विस्फारले,

'म्हणजे ? आपलं जहाज अजून सुखरूप आहे ?'

'शू ऽ !हळू बोला', मी म्हणालो, ' तुमचं ओरडणं जॉन सिल्व्हरनं ऐकलं, तर मोठी पंचाईत होईल.'

'शाब्बास जिम ! ग्रेटच आहेस तू. मला तूझा भयंकर राग आला होता. पण आता मात्र तुझ्याबद्दल अभिमान वाटतो.'

' पण आपण अजूनही संकटात आहोत.'

' छे ! तुला कुणी सांगितलं ?'

' जॉन सिल्व्हरनं तर मेढेकोट जिंकला आहे.'

' जिंकेना का ! त्याचं काय इतकं ! मी त्याला लंडनला परत नेणार आहे --- पण कुत्र्यासारखं फरपटत नेणार आहे. कळलं ?'

मी आश्चर्यानं पहातच राहिलो.

तेवढयात जॉन लांबून ओरडला,

' काय कट चाललाय ! बास करा आता. डॉक्टर, तुमची वेळ संपली आहे.'

डॉक्टरांनी मान होकारार्थी हलवली.

' जिम, मी आता निघतो. तू काहीएक काळजी करू नकोस.'

मला काही सुचलंच नाही. निदान कॅप्टन, ट्रेलॉने यांची चौकशी करावी, हे सुध्दा ध्यानात आलं नाही.

डॉक्टर जॉन सिल्व्हर जवळ गेले. आजुबाजूला कुणीच नाही हे पाहून त्यांनी जॉनला डोळा घातला,

' जॉन, मी सांगितलेलं लक्षात आहे ना ? उद्या सकाळी वादळ वाहाणार आहे. उद्या सकाळी.'

डॉक्टर जॉनशी काय बोलताहेत याची मला उत्सुकता होती. म्हणून मी डॉक्टरांच्या मागं होतोच. डॉक्टरांचं बोलणं ऐकून मला अत्यंत आश्चर्य वाटलं. जॉन तर आमचा एक नंबरचा शत्रू. तरीही डॉक्टर त्याच्याशी असं काय बोलताहेत ? उद्या वादळ होणार ?कसलं वादळ ?

डॉक्टर बाहेर पडले आणि सगळ्या खलाशांनी जॉनला घेरलं. एकच कावकाव सुरू झाली ---

'काय बोलणं झालं तुमचं ?'

'जॉन, तुझा आता आम्हाला भरवसा राहिलेला नाही.'

'तुमचा कसला कट चाललेला होता ?'

'तू सांगितलं नाहीस तरी, आम्ही फ्लिंटला विचारूच --- '.

गलका वाढल्यावर जॉन सिल्व्हर एकदम ओरडला,

' चूप बसा डुकरांनो. आता गडबड केलीत, तर एकेकाला जिवंत सोलून काढीन.'

भेदरलेले खलाशी एकदम गप्प झाले. स्वतः वरच खूष झालेला जॉन गदगदा

हसला.

' आता मी काय सांगतो ते नीट लक्ष देऊन ऐका. उद्या सकाळी खजिना आपल्या ताब्यात आला म्हणून समजा.'

पुन्हा एकदा खलाशांनी आरडाओरडा केला, पण यावेळी तो आनंदाचा होता.

जॉन सिल्व्हरनं नकाशा टेबलावर मांडला. सगळे खलाशी, अगदी माझ्यासकट, भोवती जमले. नकाशावरून बोटं फिरवत जॉन सांगू लागला,

'हे पहा, ही मेढेकोटाची जागा. सध्या आपण इथं आहोत. उद्या आपल्याला सकाळी 'कीडस् अँकरेज' याठिकाणी जावं लागेल. थोडा होडीचा प्रवास. मग या ठिकाणी पठारावर आपण पोचू. तिथं थोडी विश्रांती होईल.'

जॉननं यावेळी सगळ्यांकडं अपेक्षेनं पाहिलं. सगळयांनी होकारार्थी माना हलवल्यावर जॉननं विजयी हास्य केलं. तो पुढं बोलायला लागला,

' या टेकाडावर थोडी विश्रांती झाली की, मगंच आपण पुढं जाणार आहोत. पुढं थोडा चढ लागेल. चढावर जंगल आहे. त्या जंगलात खूप झाडं आहेत.'

एक खलाशी गदगदा हसून म्हणाला,

'जंगलात झाडं असतील, नाहीतर काय हाडाचे सापळे सापडतील ?'

जॉननं त्या खलाशाकडं थंड नजरेनं रोखून पाहिलं आणि त्याहून थंड स्वरात तो म्हणाला,

'सापळेही सापडतील आणि जास्त गडबड केलीस, तर तुलाही तिथं सापळा होऊनच पडावं लागेल.'

जॉन सिल्व्हरच्या स्वरात अशी काही जरब होती की त्या खलाशाला अक्षरश: घाम फुटला. माझी तर बोबडीच वळली. सगळे खलाशी चिमणीएवढा चेहरा करून गप्प बसले.

थोडा वेळ शांततेत गेल्यावर जॉन म्हणाला,

'त्या जंगलात आपल्याला सगळ्यात मोठं झाड दिसेल. त्या झाडाच्या तळाशी आपण सगळे जमणार आहोत. ते झाड आपल्याला मार्गदर्शन करेल. कॅप्टन फ्लिटच्या नकाशात तसं स्पष्ट म्हटलं आहे. तेव्हा आजची रात्र विश्रांती घ्या. उद्या सकाळी खजिना आपलाच म्हणून समजा --- आणि या पोरावर रात्रभर नजर ठेवा. उद्या सकाळी आपण त्याला खजिन्याकडं घेऊन जाणार आहोत.'

जॉन सिल्व्हरचे शब्द ऐकून मला अक्षरश: घाम फुटला. हा बंडखोर उद्या

आपला बळी तर देणार नाही ?

एवढ्यात कुणीतरी विचारलं,

'या पोराला कशाला न्यायचं आपण ?'

'असू दे', जॉन डोळा घालत म्हणाला, 'या पोराला आपल्याबरोबर असू दे. खजिन्यातला त्याचा वाटा त्याला आणि मित्रांनाही द्यायचा आहे नाही का ?'

सगळे खलाशी फिदिफिदी हसले.

'आणि उद्या सकाळी तुम्ही कोट्याधीश होणार. समजलं ? आयुष्यात कितीही पैसे उधळलेत तरीही सोनं संपायचं नाही. इतकंच काय पण मेल्यावरही तुम्हाला सोन्यावरच जाळावं लागेलं'.

'हुर्रे ऽऽ' म्हणून सगळे नाचायला लागले. रम ढोसायला लागले. सगळ्यांच्या डोळ्यापुढं सोनं नाचत होतं. भसाड्या आवाजात सगळेजण गाणी म्हणत होते.

मी मात्र हादरलो होतो. तासाभरात सगळं शांत झालं. मॉर्गन माझ्यावर पहारा ठेवण्यासाठी जागत बसला होता.

आडदांड आणि ओबडधोबड खलाशी मोठ्यानं घोरायलाही लागले होते.

मला हे कळत नव्हतं की फ्लिटचा नकाशा जॉन सिल्व्हरकडं कसा आला ! डॉक्टर परत गेले म्हणजे कुठं गेले ?

उमरावांचं काय झालं ? आणि कॅप्टन ? तो तर जखमी झाला होता ! आता हे सगळेजण कुठं आहेत ? बेन गनची त्यांच्याशी भेट झाली असेल का ?

आणि आपण कड्याखाली आणून ठेवलेलं ते जहाज ! ते कुठं असेलं ? का गेलं समुद्रात भरकटत ?

उद्या जॉन सिल्व्हरला खजिना गवसल्यावर माझं आणि माझ्या मित्रांचं कसं होणार ? बहुधा आम्हालाच या बेटावर मरावं लागणार !

विचार करता करता मलाच केव्हातरी झोप लागली ---

--- जाग आली तेव्हा माझ्या लक्षात आलं की फटफटीत उजाडलं होतं आणि जॉन सिल्व्हर त्याच्या बुटांनी मला ढोसत होता.

प्रवासासाठी तयार झालेले खलाशी माझ्याकडं बोटं दाखवून गदागदा हसत होते. जॉन सिल्व्हरनं माझ्या कमरेला दोरी बांधली. दरवेशाबरोबर अस्वल जावं, तसा माझा प्रवास सुरु झाला.

जॉन सिल्व्हरला एक पाय नसला, तरी तो सगळ्यांच्या पुढं धावत होता.एका

पायावर ! मी त्याच्या बरोबर फरपटला जात होतो.

जॉननं ताब्यात घेतलेल्या दोन्ही होड्या समुद्रकिनाऱ्यावर होत्या. आम्ही सगळे होडीत बसून 'कीडस् अँकरेज'वरुन निघालो. एका कड्याला वळसा घालून पठाराच्या दिशेने निघालो आणि थोड्याच वेळात पुन्हा किनाऱ्याला लागलो.

आमच्या प्रवासाचा पहिला टप्पा आम्ही ओलांडला होता.

आता पठाराकडं जाणाऱ्या चढणीच्या रस्त्याला आम्ही लागलो. हा प्रवास फारसा सहज नव्हता. वाटअरुंद होती. आडवळणाची होती. डगर चढताना आमच्या प्रवासाची गती मंदावली.

एरवी बळकट आणि शक्तीशाली वाटणारे खलाशी धापा टाकायला लागले. मला गंमत वाटली. जॉन सिल्व्हरसुध्दा आता घाई न करता संथपणे चालला होता.

पठाराकडचा प्रवास करण्यासाठी आम्हाला तास - दीड तास लागला. शेवटी एकदाचे कसेबसे आम्ही पठारावर जाऊन पोहोचलो.

सगळ्यांना हायस वाटलं. समोर घनदाट जंगल पसरलं होतं. पण आता आम्हाला विश्रांतीची नितांत गरज होती. म्हणून पठारावरच्या मोठ्या दगडांवर आम्ही विसावलो.

खजिन्याच्या शोधासाठी निघताना ओसंडून वाहणारा उत्साह आता ओसरला. खलाशांच्या चेहऱ्यावर आता दडपण दिसत होतं. एकटा जॉन सिल्व्हर मात्र शांत होता. मजेत शीळ घालत होता. पण पठारावरच्या भणभण वाऱ्यात त्याची शीळ कुणालाच ऐकू जात नसावी.

दूरवरच्या अथांग सागराचं दर्शन धुक्यात हरवलं होतं आणि वाऱ्याची शीळ वगळता कुठलाच आवाज ऐकू येत नव्हता.

सगळेजण एकमेकांची नजर चुकवण्याचा प्रयत्न करत होते. वाऱ्याचा आवाज मोठा असूनही, माझी छाती धडधडतीय् हे मलाही जाणवत होतं.

अशा स्थितीत किती वेळ गेला कुणास ठाऊक. जॉन सिल्व्हर एकदम ताडकन् उभा राहिला आणि ओरडला,

'चला ! आता आपल्याला जंगलातील प्रवासाला सुरवात करायची आहे. उठा !'

काहीशा नाईलाजानं खलाशी उठले. जॉन सिल्व्हरनं एकदा नकाशावरुन नजर फिरवली. गुंडाळी करुन नकाशा खिशात कोंबला आणि आमची पलटण पुढं

निघाली.

त्या घनदाट जंगलात प्रवेश करतांना आमच्या मनावरचं दडपण वाढलं. वाऱ्याचा आवाज आता हळूहळू कमी झाला आणि रातकिड्यांच्या किर्र स्वराचं संगीत आमच्या कानावर आलं. बुटाखाली पाचोळा वाजत होता. एरवी फुशारक्या मारणारा मॉर्गन आता भेदरला आहे, हे स्पष्ट जाणवत होतं.

झाडांच्या आणि प्रामुख्यानं वेलींच्या गर्दीतून वाट काढत आम्ही पुढं निघालो. जॉन सिल्व्हरला वेलीतून रस्ता शोधताना अडचण येत होती. त्याची कुबडी जाळीत फसत होती.

फ्लिंटला आणि त्याच्या जहाजाला शिव्या देत जॉन सिल्व्हर पुढं जात होता.

अखेर प्रवास करत करत आम्ही उंच झाडांच्या भागात येऊन पोचलो. सगळीच झाडं प्रचंड उंचीची आणि रुंद बुंध्याची होती. पण त्या जंगलातील सर्वात मोठ्या झाडाजवळून खजिन्याकडं वाट जात होती, हे जॉनला आणि मला नकाशावरून समजलं होतं. जॉननं हे खलाशांना सांगितल्यावर धापा टाकणारे खलाशी इकडे तिकडे बघायला लागले. शेवटी वैतागलेला मॉर्गन म्हणाला,

'आता या गर्दीत मोठं झाड कुठं दिसायचं? हा खजिना आमचा जीव खाणाराय् असं दिसतं.'

जॉन सिल्व्हर गुरगुरला,

'मग? कष्ट केल्याशिवाय का तुम्हाला खजिना मिळणाराय्? का सोनं तुम्हाला कुणी घरी आणून देणाराय्? शोधा- मोठं झाड शोधून काढा.'

एवढे दांडगे खलाशी, पण स्वतंत्रपणे जंगलात शोध घेण्याची त्यांची हिंमत होत नव्हती. माझ्या कमरेला बांधलेल्या दोरीला हिसका देऊन जॉन खेकसला,

'चल रे पोरा, आपणही झाड शोधू या.'

काही मिनिटं गेली असतील- नसतील, तोच मॉर्गनची भयाण किंकाळी आमच्या कानावर आली. इतकी भयाण की माझ्या काळजाचं पाणी पाणी झालं.

सगळेजण किंकाळीच्या दिशेनं धावले.

एका झाडाखाली पांढराफटक पडलेला मॉर्गन लटलट कापत होता. त्याचा चेहरा प्रेतासारखा हिडीस झाला होता.

'काय झालं?', जॉन सिल्व्हरनं खेकसून विचारलं.

उत्तर न देता मॉर्गननं समोरच्या मोठ्या झाडाकडं बोट दाखवलं. आमच्या

नजरा समोरच्या मोठ्या झाडाकडं वळल्या.

बहुधा जंगलातलं ते सगळ्यात मोठं झाड असावं. झाडाच्या बुंध्याशी एक हाडाचा सांगाडा पडला होता. जणू तो आमच्याकडे बघून खदखदा हसत होता.

विजेचा शॉक बसावा त्याप्रमाणं सगळेजण त्या हाडाच्या सांगाड्याकडं बघतंच राहिले. त्या सापळ्याचं दर्शन खरोखरंच भयाण होतं.

मेलेल्या खलाशाच्या अंगावरील झग्याचे काही तुकडे अजून हाडांवरून लोंबत होते. असं वाटत होतं की सापळा उठणार आणि सरळ आपल्यावर चाल करून येणार !

पहिल्या धक्क्यातून सावरलेला एक खलाशी म्हणाला,

'खजिना शोधायला येणाऱ्या प्रत्येक माणसाची ही अशी अवस्था होते !'

पाठीच्या कण्यावरून पाल जावी, तसं प्रत्येकाला झालं.

इतक्यात झाडांच्या गर्दीतून आवाज घुमला,

'डार्बी ! माझी रम आण', थेट फ्लिटचाच आवाज ! मॉर्गन मटकन् खालीच बसला. डिक थरथर कापायला लागला.

'फ्लिटच्या भुतानं आपल्याला गाठलं, आता ते आपल्याला सोडत नाही', तो किंचाळला.

जॉन सिल्व्हरनं स्वतःला सावरलं. तो म्हणाला,

'तुम्ही सगळे मूर्ख आहात. सापळ्यामागचं ते प्रचंड झाड बघा. जंगलातील ते सगळ्यात मोठं झाड आहे. फ्लिटच्या नकाशात दाखवलेली ती सगळ्यात मोठी खूण आहे. बघा नीट बघा. भ्याडांनोऽ, डोळे उघडून बघा.'

काही क्षण कुणीच काही बोललं नाही. मग एकजण म्हणाला,

'हे सगळं खरं असेल जॉन. पण त्या सापळ्याचं काय ?'

न भिता जॉन सिल्व्हर सापळ्याजवळ गेला. थोडा वेळ त्यानं सापळ्याचं निरीक्षण केलं. मग तो एकदम् हसायला लागला.

'हा बहुधा फ्लिटचा सहकारी ॲलरडाईस दिसतोय्. खजिना पुरून येताना फ्लिटनं त्याला संपवलं असं दिसतय्— मला खजिना सापडलाऽ— पाहिलंत ? फ्लिटनं याला इथं खूण म्हणून ठेवला आहे. बघा याच्या तोंडाची दिशा बघाऽ—'

खरंच ! सापळ्याचं तोंड ज्या दिशेला होतं, त्या दिशेला झाडीतून एक पाऊलवाट गेली होती. आता एकदम् उत्साह आलेले सगळे वीर त्या वाटेवरून

लगबग पुढं निघाले. इतक्या उत्साहानं की मी आणि जॉन सिल्व्हरही मागं पडलो.

जॉन सिल्व्हरचा अंदाज चुकला नाही. त्या पाऊलवाटेनं आम्ही बरोबर खजिना पुरलेल्या जागी येऊन पोचलो.

'खजिना मिळाला', मॉर्गन ओरडला.

मी भरभर वर जाऊन पाहीलं. एका टेकाडावर तशी जागा होती. उकरून आत काही तरी दडवावं तशी ती जागा दिसत होती.

म्हणजे या गुंडांना खजिना मिळणार तर !

दोघंजण घाईगर्दीनं पुढं गेले आणि त्यांनी भुसभुशीत माती उकरायला सुरवात केली. लवकरच आतून एक फळी बाहेर आली. त्यावर फ्लिटच्या जहाजाची अक्षरं 'वॅलरस' अशी कोरली होती.

आता लवकरच खजिना बाहेर पडणार तर !

एवढ्यात जॉन सिल्व्हरनं माझ्या कमरेची दोरी सोडली. सगळे खलाशी जमीन उकरण्य़ात गुंतले होते. जॉन सिल्व्हरनं कमरेचं पिस्तुल काढून माझ्या हातात ठेवलं. तो म्हणाला,

'जिम, तयार हो या डुकरांना मारायला. काळजी करू नकोस. मी तुझ्या बाजूला आहे.'

मी थक्कच झालो. काय मनुष्य आहे हा ? पण आता विचार करण्याची वेळ नव्हती. वेळ होती, ती फक्त कृती करण्याची.

घामेघुम होईपर्यंत खलाशांनी खड्डे खणले. पण --- वाळूत, मातीत मिसळलेले फक्त एकच सोनेरी नाणं मॉर्गनच्या हाती लागलं. संतापानं धुमसत तो जॉनवर ओरडला,

'हाच तुझा खजिना काय ?'

'आणखी थोडं खोल खणा. म्हणजे सोन्याचं आणखी एखादं नाणं सापडेलं.' कुचकट स्वरात जॉन सिल्व्हर म्हणाला.

पाचही खलाशी खड्ड्यातून बाहेर आले. मेरीनं कमरेचा सुरा उपसला आणि म्हणाला,

'आम्हाला फसवतोस काय ? आता तू जिवंत राहात नाहीस.'

तेवढ्यात जॉननं कोटाच्या खिशातलं पिस्तुल उपसून जॉर्ज मेरीवर झाडलं. मेरी कोसळला. अचानक झाडांच्या गर्दीतून एक गोळी सूंऽ सूंऽ करत आली आणि

डीकही कोसळला. मी आश्चर्यानं पाहीलं. झाडीतून डॉ. लिव्हसे, टॉम ग्रे आणि बेन गन बाहेर आले. उरलेल्या खलाशांनी वाऱ्याच्या वेगानं पळ काढला. जॉन सिल्व्हरनं डॉक्टरांना लवून अभिवादन केलं. तो म्हणाला,

'डॉक्टर, वेळेवर आलात. जिमला विचारा, मी त्याचे प्राण वाचवले आहेत. शिवायऽऽ---'

'ते नंतर बोलू ', डॉक्टर म्हणाले, 'अगोदर खलाशांच्या मागावर.'

आम्ही वेगानं निघालो. आता फरपट होत होती, ती जॉन सिल्व्हरची. आम्हाला वाटलं होतं की खलाशी होड्यांकडं धावतील. प्रत्यक्षात मात्र ते जंगलातच लपून बसले होते. समुद्राकाठी दोन होड्या होत्या. त्यापैकी एक डॉक्टरांनी ग्रेच्या मदतीनं पार मोडून तोडून टाकली. त्यामुळे खलाशी बेटावरच अडकून पडणार होते.

आम्ही राहिलेल्या बोटीतून माघारी वळलो. जॉन सिल्व्हरनं बेन गनला ओळखलं. झाडीमधून फ्लिंटप्रमाणं आवाज काढणारा बेन गनच होता. माझ्या लक्षात आलं , डॉक्टरनी जॉनला बरोबर फितवलं होतं आणि जिवाच्या आशेनं तोही फितला होता.

माझे सगळे मित्र सुखरुप होते आणि बेन गनच्या गुहेत होते. बेन गननं फ्लिंटचा सगळा खजिना अगोदरच उकरून काढला होता आणि गुहेत सुखरूप ठेवला होता. डॉक्टर म्हणाले,

'बेननं ही सुरेख कामगिरी केली. जॉन, तू आमच्या बरोबर येणार का तुझ्या मित्रांबरोबर बेटावरच राहणार ?'

'छे ! मी तुमच्याबरोबर लंडनला परत येणार', घाबरलेला जॉन घाईघाईनं म्हणाला.

आम्ही बेनच्या गुहेत गेलो, तेव्हा ट्रेलॉनि यांनी माझं स्वागत केलं. कॅप्टननं तर माझी पाठच थोपटली. तो म्हणाला,

'जिम, तू मोठा धाडसी मुलगा आहेस बुवा ! तुझ्यामुळं आपलं जहाज सुरक्षित जागी आलं.'

बेनच्या गुहेत गेल्यावर मी उडालोच. पिवळ्याधमक सोन्याच्या नाण्यांचे ढीग आत पडले होते. माझे डोळेच दिपले.

सगळा खजिना आणि इतर साहित्य जहाजावर चढवायला आम्हाला दोन दिवस लागले. मग आमचं जहाज आम्ही खाडीतून समुद्रात आणलं. परतीचा प्रवास

सुरू झाला. आम्ही प्रचंड श्रीमंत झालो होतो.

वाटेत प्रत्येक बंदरावर थांबत येत होतो. जॉन सिल्व्हर त्याच्या वळणावर गेलाच. एका थांब्यावर त्यानं थोडंफार सोनंनाणं खिशात घालून पळ काढला. तो आजपर्यंत आम्हाला दिसलेला नाही.

लंडनला आम्ही सुखरूप पोचलो.

बेन गन हा ट्रेलॉने यांचा विश्वासू नोकर झाला. उमरावांच्या पायात स्वतःच्या कातड्याचे जोडे करून घालायचे तेवढे त्यानं बाकी ठेवले. डॉक्टर निवृत्त झाले.

आणि मी आमच्या खानावळीचं - 'दि ॲडमिरल बेनबो'चं - रूप पालटून टाकलं. आईला किती आनंद झाला, ते शब्दात सांगणं कठीण ! आमची खानावळ आता मस्त चालते.

वाचक मित्रांनो, माझी कथा संपली. मी पुन्हा अशा धाडसी प्रवासाला जाईन किंवा नाही, हे सांगता येणार नाही. गेलो तर त्याचीही कथा तुम्हाला ऐकवेनच.

तोपर्यंत - गुड बाय् !

***

BVBK-0402891